शुक्रवार, २४ मे २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २६४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 24 MAY 2024 | adhunikkesari.com | YEAR-03 • ISSUE-264 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05

# आ. रोहित पवारांचा उद्योगपतींच्या घशात भूखंड घालण्याचा घाट

## उमेश पाटील : एमआयडीसी भूखंड घोटाळ्याची एसआयटीमार्फत चौकशी करा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी एमआयडीसीच्या नावाखाली स्थानिक शेतकऱ्यांना डावलून बाहेरून आलेल्या आणि भारताला करोडो रुपयांना फसवलेला उद्योगपती आणि व्यापाऱ्यांना फायदा व्हावा म्हणून घाट घालत भूखंड घशात घालण्याचा प्रयत्न सुरू केला असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला.**

तरुणांना रोजगार उपलब्ध होण्याकरिता एमआयडीसी व्हावी की काही ठराविक उद्योगपतींना आणि व्यापाऱ्यांना त्याचा



फायदा मिळवून देण्यासाठी रोहित पवार यांनी एकाच गावात एमआयडीसी करण्याचा अट्टाहास सुरू केला आहे. एकाच ठिकाणी एमआयडीसी होण्याचा इतका आग्रह रोहित पवार यांचा का होता याचा अभ्यास केल्यानंतर फार मोठा भूखंड घोटाळा इथे उदयाला येत असल्याचे लक्षात आल्याचे उमेश पाटील म्हणाले.

ज्या कर्जत - जामखेडच्या पाटेगाव व खंडाळा येथील ४५८ हेक्टर म्हणजे जवळपास १२०० एकर क्षेत्र संपादित केले जाणार आहे. त्याठिकाणी मूळ जमीनदार, शेतकरी आहेत. काही जमीनी द्यायला तयार आहेत तर काही गावे जमीनी देण्यास विरोध करत आहेत. या गावातील जमीनींपेक्षा इतर गावात जी जागा आहे ती उपजत जागा आहे ती वापरली जाऊ नये असा लोकांचा आग्रह आहे. मात्र रोहित पवार यांचा त्याच जागेवर एमआयडीसी झाली पाहिजे हा आग्रह का आहे तर मुळ शेतकऱ्यांकडून कवडीमोल दराने जागा घेतलेल्या उद्योगपतींना भरमसाठ मोबदला मिळावा यासाठी असल्याचा थेट हल्लाबोलही उमेश पाटील यांनी केला.

यावेळी उमेश पाटील यांनी पाटेगाव, खंडाळा गावात ज्यांनी जागा घेतलेल्या त्यामध्ये आंतरराष्ट्रीय गुन्हेगार नीरव मोदी याची सहा ते सात ठिकाणी जमीन आहे.याशिवाय महाजन, अग्रवाल, पोद्दार, छेडा, खन्ना, जैन, शेट्टी, मेहता यांना मोबदला मिळवून देण्यासाठी लोकांनी रोहित पवार यांना निवडून दिले आहे का असा सवालही उमेश पाटील यांनी केला. संपादीत जमीनीमध्ये कवडीमोल दराने जमीनी खरेदी करता येत नाही हे रोहित पवार यांना चांगले माहित आहे. मात्र तरीही सन २०२१-२२ मध्ये जमीनी खरेदी केलेल्या आहेत. रोहित पवार यांना तरुणांच्या रोजगाराचा एवढा कळवळा आहे तर स्थानिक लोकांचा विरोध असताना रोहित पवार यांचा त्याच जागेवर एमआयडीसीचा आग्रह का आहे हा खरा चेहरा जनतेसमोर आता यायला लागला आहे असेही उमेश पाटील म्हणाले.

**उमेश पाटील यांनी बाहेर काढलेल्या घोटाळ्यामध्ये राहुल महाजन यांचा गट क्रमांक** - (१९, २८/१) फेरफार क्रमांक (६२२,६३३), श्रीगोपाळ ताराचंद पोद्दार गट क्रमांक- (३०,३७/१/अ/१)(५९८),(५९७),(५९७),(५७७),(६२६),नयन गणेश अग्रवाल - गट क्रमांक (३०,३७/१/अ/१, ३७/१/ब,४८,६६,५६)(५९८),(५९७),(५९७),(५७७),(६२६),(५९७),अमोल माधव पाटील गटक्रमांक - (३०,३७/१/अ/२,३८)(६१७),(६१३)(६१४),मे श्री असोशिएटस (अग्रीकल्चर) भागीदारी संस्था तर्फे भागीदार सुलक्षणा सुर्यकांत जाधव गट क्रमांक- (३०,३७/१/अ/१,३३,६७/२)(६६१),(६६४),(६६४),(६४४),फायरस्टोन ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड गट क्रमांक- (३५,३१,३९/१,५७,)(२७०),(२७०),(२७०),निरव दिपक मोदी गट क्रमांक- (३१,३५,३९/१,५८,५९,६१,)२६५),(२६५),(२६५), (२७१),(२७१),(२६५),महादेव दादा शिर्के (६४४),(६४३),(६३९),रिधीमा निलेश जैन (६१६),(५६७),आरित्रो आशिष रॉय (६१४),अमिष नवीन छेडा (६१४), (५६५),पंकज विनोद खन्ना (६१६),(५६५),ओमप्रकाश पुत्र धारुमल मेहता (२८८),कमलेश रतीलाल शहा (३२९),(३२५),(३२५),कुंजल नवीन छेडा (५७८),जितल निकेत रांभिया (५७८),तरुण मणिलाल गाला (५७८),राजेश नानजीभाई गाला (५७८), विनोदकुमार मणिलाल गाला (५७८), राजित रश्मीन शाह (५६५),उमेश आनंद शेट्टी (६००),सोमनाथ नारायण आळशी (६००), संतोष पांडुरंग देशमुख (६००),विनोद गंभीर पाटील (६४१),(६३७),ओमप्रकाश सावरमल अग्रवाल (५७७),गणेश ओमप्रकाश अग्रवाल (५७७),संजय कृष्णाजी भेरे (५७७),निकेत खुशल रांभिया (६२६),नेहा रामचंद्र सावंत (६२६),प्रिती अभिजीत भांडेपाटील (६२६),फायरस्टोन ट्रेडिंग प्रा. लि. कंपनीकरीता जनरल कु. मु. सदानंद शंकर यादव (४३५),वर्षा विवेक पाटील (६३७),फायरस्टोन ट्रेडिंग प्रा. लिमिटेड (२७०),आदींनी जागा खरेदी केल्या आहेत. यामध्ये आंतरराष्ट्रीय फरार गुन्हेगार नीरव मोदी यांनी सर्वाधिक जागा खरेदी केली असल्याचे समोर येत आहे असेही उमेश पाटील म्हणाले. एमआयडीसी प्रस्तावित झाल्यावर जमीनी खरेदी झाल्यात अशा नाही त्याअगोदरही झाल्या आहेत परंतु जे तिथले खातेदार आहेत,मुळ शेतकरी आहेत, त्यांना मोबदला न मिळता उद्योगपतींना, व्यापाऱ्यांना, आंतरराष्ट्रीय गुन्हेगाराला पैसे मिळवून देण्यासाठी, बेरोजगार तरुणांच्या नावाखाली एक खोटं चित्र उभे करत आहे ते कर्जत - जामखेड नव्हे तर महाराष्ट्रातील जनतेला आमदार रोहित पवार हा किती फ्रॉड आहे आणि त्यांचा दाखवायचा चेहरा आणि खरा चेहरा आता समोर आणला आहे. त्यामुळे या प्रकरणाची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी एसआयटीमार्फत चौकशी करावी अशी मागणीही उमेश पाटील यांनी केली.

# शैक्षणिक क्षेत्रातील भरीव कार्याबद्दल शैलजा प्रमोद जोशी यांना दैनिक आधुनिक केसरीचा 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**संजय व्यापारी**

**छत्रपती संभाजीनगर :** सावित्रीबाईचे विचार



घेवून ग्रामीण भागातील महिलांना शिक्षण क्षेत्रात पुढे आणण्यासाठी, ग्रामीण भागात उच्च शिक्षण देण्यासाठी करमाड येथे महाविद्यालय सुरु करून उच्च प्रतीचे शिक्षण देत नॅक कमिटी कडून महाविद्यालयास ॲकरीडेशन मध्ये B ++ चा दर्जा मिळवून देण्यात शैलजा प्रमोद जोशी यांना यश मिळाले आहे. याचे श्रेय त्यांनी गुणवत्तेला दिलेले महत्व आहे. शैक्षणिक क्षेत्रातील शैलजा प्रमोद जोशी यांच्या कार्याची दखत घेत दैनिक आधुनिक केसरीचा 'आयडॉल महाराष्ट्र' हा राज्यस्तरीय त्यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

**थोडक्यात परिचय :** शैलजा प्रमोद जोशी

**शिक्षण :** बीएससी होम सायन्स, एमए इंग्रजी आणि हिंदी, बी.एड., B.LIB.SC.आणि M.LIB (ग्रंथालय विज्ञान).

सुरुवात शिक्षक म्हणून काम, त्यानंतर राजीव गांधी रात्रीचे महाविद्यालयामध्ये लेक्चरर म्हणून काम केले, नंतर तेथेच प्राचार्यपदावर रुजू झाले आणि नंतर करमाडच्या राजीव गांधी कॉलेजमध्ये ग्रंथपालपदावर कार्यरत. लहानपणापासून शिक्षण क्षेत्राची आवड, घरात शैक्षणिक वातावरण असल्यामुळे या क्षेत्रात उत्तम प्रगती करता आली. स्वतःची शैक्षणिक संस्था असावी व आपल्या संस्थेतून अनेकांना घडवून मोठ मोठ्या पदावर कार्य करताना पहाण्याचे स्वप्न होते, त्यासाठी खूप संघर्ष करून स्वतःची शिक्षण संस्था उभी केली, पण एखादी संस्था उभी करणे व ती यशस्वीपणे चालवणे किती अवघड असते याचे चांगले व वाईट अनुभव खूप घेतले. खूप शिकायला मिळाले, आजूबाजूला वावरणारे चेहरे आपण ओळखतो त्यापेक्षा कितीतरी वेगळे असतात हे प्रत्यक्ष अनुभवातून पाहायला मिळाले.

परिस्थितीमुळे खूप लोकांना शिक्षण अर्धवट सोडून नौकरी करावी लागते व पुढे शिकायची इच्छा असूनही शिक्षण घेता येत नाही अशांसाठी रात्रीचे महाविद्यालय सुरु करावे म्हणजे नौकरी करून ज्यांना शिक्षण पुढे चालू ठेवयाचे ते पार्ट टाईम इथे त्यांचे शिक्षण पूर्ण करू शकतात, अशी संकल्पना मनात आली व 1994 साली राजीव गांधी रात्रीचे महाविद्यालय सुरु केले. अशा नौकरी करून शिक्षण घेऊ इच्छीणाऱ्यांसाठी एक संधी उपलब्ध करून दिली. एखादी शैक्षणिक संस्था उभी करणे किती अवघड असते हे अगदी सुरुवातीपासूनच अनुभवले. अगदी जवळचे म्हणणाऱ्या लोकांनीच जास्त अडचणी निर्माण केल्या पण आपल्यात जर जिद्द असेल तर आपण ध्येयावर लक्ष केंद्रित करायचे म्हणजे रस्त्यातील सर्व काटे हळुहळु कमी होत जातात हे पण अनुभवले व अतिशय खडतर प्रवास करून कॉलेज उभे केले. आज हजारो विद्यार्थी- विद्यार्थीनी येथून आपले स्वप्न पूर्ण करीत आहेत, याचा अतिशय आनंद होत आहे. राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादशी संलग्न आहे. त्याची स्थापना डॉ. प्रमोद काशिनाथराव जोशी यांनी 1994 मध्ये सुरुवातीच्या टप्प्यात ज्यांना उच्च शिक्षण घ्यायचे होते, परंतु नोकरीमुळे उच्च शिक्षण सुरू ठेवता आले नाही, अशांसाठी रात्रीचे महाविद्यालय सुरू केले. त्याची




स्थापना एका कार्यक्रमासह झाली होती. आता हे महाविद्यालय ग्रामीण भागातील करमाड येथील डे कॉलेजमध्ये स्थलांतरित करण्यात आले असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे या उद्देशाने हे महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. राजीव गांधी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय स्थलांतरित करण्यासाठी पालक संस्थेद्वारे ग्रामीण स्थान निवडले जाते कारण अजूनही जागतिक युगात, भारतातील बहुसंख्य लोकसंख्या खेड्यांमध्ये राहते आणि म्हणूनच भारतात ग्रामीण शिक्षणाचा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताला सशक्त राष्ट्रात रूपांतरित करण्याचा पाया प्राथमिक आणि ग्रामीण स्तरावर घातला गेला पाहिजे आणि त्यामुळे शिक्षणाचा दर्जा सुरुवातीपासूनच उत्कृष्ट असला पाहिजे. मोफत शिक्षण असूनही अनेक गळतीची कारणे शोधली पाहिजेत कारण ते प्रगतीच्या मार्गात अडथळा आहे. उच्च शिक्षणाच्या स्थितीत सुधारणा, शैक्षणिक गुणवत्ता, वचनबद्ध शिक्षक आणि या शिक्षकांना उच्च वेतन हे विकासाचे फळ आहे. महाविद्यालयासाठी सध्याचे स्थान निवडण्यामागील कारण म्हणजे

**भविष्यातील उद्दिष्टे :** ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विशेषत : मुलींमध्ये शिक्षणाची आवड आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी कार्य करणार . विद्यार्थ्यांना केवळ मुख्य प्रवाहातील विषयांमध्येच नव्हे तर व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमांमध्येही प्रशिक्षण मिळावे जेणेकरून त्यांना उद्योगासाठी त्याचा खूप मोठा फायदा होईल . म्हणून तांत्रिक शिक्षण सुरु करणार .

**स्वारस्ये :** संगीत आणि विशेषत : शास्त्रीय संगीत, रेखाचित्र, वाचन .

**सामाजिक उपक्रम :** समन्वयक अंगणवाडी सेवा, अध्यक्ष, स्वप्नपूर्ती महिला मंडळ, सचिव, भारतीय संस्कृती सौवर्धन शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद . सचिव, चिंतामणी हायर अँड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, माजी सदस्य अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, शेतकरी संघटना . श्रमिक शिक्षण आणि महिलांच्या प्रगतीच्या जागृतीसाठी कार्य .

हे सर्व शैक्षणिक गुण विकसित करणे. महाविद्यालय केवळ शैक्षणिक सुविधाच पुरवत नाही तर सामाजिक विस्ताराच्या कार्यासाठी देखील कार्य करते, याचा परिणाम म्हणून दोन गावांना निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त झाला ते सटाणा आणि लाडगाव-हिवरा या महाविद्यालयाच्या NSS ने दत्तक घेतले आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे ही एकमेव उच्च शैक्षणिक संस्था आहे, ज्यामध्ये बीए, बीकॉम आणि बीएससी अशा तीन शाखा आहेत. मुली महाविद्यालयात जास्त आहेत कारण, त्यांच्या पालकांना भीती आणि असुरक्षिततेच्या भावनेमुळे शिक्षणासाठी लांब प्रवासाचा धोका पत्करायचा नाही. विद्यार्थ्यांना उत्तमोत्तम सुविधा देण्याचा महाविद्यालयाचा प्रयत्न असतो. त्याचे उदाहरण म्हणजे कोणत्याही एजन्सीकडून वीजपुरवठा होत नाही. महाविद्यालयाने निर्माण केलेली सर्व विद्युत उर्जा महाविद्यालय स्वतः सौर पॅनेलद्वारे वापरते. विशेषतः 1985 पासून जगभरातील प्रतिष्ठित संदर्भ पुस्तकांचे प्रकाशक SOUTH-ASIA (INTL.) PUB. CO. यांच्या शैक्षणिक आवृत्तीसाठी शैलजा प्रमोद जोशी यांची निवड झाली आहे. ज्यांनी सर्वोत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी प्रतिकूलतेच्या विरुद्ध उंची गाठली आहे, ज्यांनी आपल्या कार्यात वेगळा ठसा उमटवला आहे, अशा लोकांबद्दल आमच्या "विशिष्ट आणि प्रशंसनीय यशवंत"च्या आगामी आवृत्तीमध्ये चरित्रात्मक-नोट समाविष्ट करण्यासाठी शैलजा प्रमोद जोशी यांच्या नावाची शिफारस करण्यात आली आहे.

# बोगस बियाणे, खते आढळली तर खबरदार

## एकनाथ शिंदे : दुष्काळ आढावा बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** बोगस बियाणे आणि खत आढळले तर जेलमध्ये टाकले जाणार आहे. मुख्य सप्लायरचा सर्व्हे करून तपासणी करणार आणि बोगस बियाणांची अडचण येणार नाही, याची काळजी घेऊ. बोगस बियाणांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी सूचना दिल्या आहेत. अवकाळीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्या, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. छत्रपती संभाजीनगरमध्ये मुख्यमंत्री शिंदेंच्या उपस्थितीत दुष्काळाबाबत बैठक पार पडली.


पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, वाटर लेवल वाढवण्यासाठी यासाठी उपाययोजना सुरु केल्या आहेत. नाम फाऊंडेशन आहे, आप्पासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान आहे. अशा अनेक एनजीओ आहेत. अमिर खानचे पाणी फाऊंडेशनही आहे. या सर्व एनजीओंची मदत घेऊन गाळमुक्त धरण आणि गाळमुक्त शिवार करण्याचे प्रयत्न करणार आहोत. स्टोरेज कॅपेसिटी वाढली तर पाणीसाठा वाढेल. पाण्याचे नियोजन व्यवस्थित व्हावे, यासाठी सूचना दिल्या आहेत. पिण्याचे पाणी बांधकामासाठी वापरू नये, यासाठी सूचना दिल्या आहेत, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मराठवाड्यात 1837 टँकर सुरु आहेत. 1250 गावांमध्ये हे टँकर जात आहेत. टँकर्सची आवश्यकता भासली तर ग्रामसेवकांपर्यंत , तलाठ्यांपर्यंत सूचना दिलेल्या आहेत. त्यांना काय गरजेचे आहे, याची माहिती देण्यास सांगण्यात आले आहे.

त्यानुसार पुरवठा केला जाणार आहे. शिवाय टँकर आणि चाऱ्याची देखील व्यवस्था केली जाणार आहे. पाणी स्वच्छ असले पाहिजे, पाण्याची गुणवत्ता चांगली असली पाहिजे. आपण पूर्वी डिपीडीसीमधून चारा उगवण्यासाठी पैसे दिले होते. त्यामुळे जिल्ह्यामध्ये सध्या पूरेल एवढा चारा आहे. चाऱ्याची कमतरता भासू नये, यासाठी सूचना देखील दिलेल्या आहेत. पाण्याच्या जुन्या बीलाचे नंतर पाहू. थकीत बिलामुळे पाणीपुरवठा योजना बंद पडणार नाही. भूजल पातळीत घट आलीये. त्यासाठी संस्थांना सूचना दिल्या आहेत, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

# भारतात प्रामाणिक नेत्यांची कमतरता : गडकरी

आधुनिक केसरी न्यूज

**चंदीगड :** भारतात पैशांची कमतरता नाही. पण देशासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या नेत्यांची कमतरता आहे", असे विधान केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी चंदीगड येथे बोलताना केले. रस्ते, महामार्ग आणि पायाभूत सुविधा यांचे निर्माण करण्यासाठी नितीन गडकरी झपाटून काम करतात, हे याआधी अनेकदा दिसले आहे. पायाभूत सुविधा उभारताना प्रशासनातील लाल फितीच्या कारभारावर त्यांनी अनेकदा बोट ठेवले आहे. प्रशासनासह ते पुढाऱ्यांवरही बोलायला कमी करत नाहीत. चंदीगडमध्ये बोलत असताना त्यांनी देशाला प्रामाणिक नेते हवे असल्याचे म्हटले. नितीन गडकरी म्हणाले, "मी १९९५ साली युतीची सत्ता असताना मी मंत्रीपद भुषविले. आज तुम्ही मुंबईत गेल्यास तुम्हाला वरळी-वांद्रे सी लिंक दिसेल. तो तयार करण्याचे भाग्य मला मिळाले. मुंबईत ५५ पूल तयार केले. मुंबई-पुणे महामार्ग तयार करण्याची जबाबदारी मी पार पाडली. तेव्हा माझ्याकडे फक्त पाच कोटी होते. पैशांची कमतरता होती. त्यावेळी रिलायन्सचे ३६०० कोटींचे टेंडर मी रद्द केले. आज त्याची किमंत ४० हजार कोटींच्या घरात आहे. मी ते टेंडर रद्द केल्यानंतर खूप वाद झाला. सर्वात कमी किंमत त्यांनी दिली होती, अशी टीका माझ्यावर झाली. पण मला सांगायला आनंद होतो की, आम्ही कॅपिटल मार्केटमध्ये गेलो.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

कोकणातून मुंबईत कामानिमित्त येणारे चाकरमानी, खेड्यापाड्यातून कामानिमित्त मुंबई पुण्याला स्थायिक झालेली माणसं ही सगळी वर्षातून एकदा तरी आपल्या गावी जायला मिळावं म्हणून केवढी आसुसलेली असतात. त्यांचं गाव, त्या गावातला निसर्ग त्यांना बोलावत असतो. त्याची ओढ असते. आणि तिथे गेल्यावर काय होतं ? जणू जादू होते. शहरामध्ये दररोजच्या कामाने त्रासलेला तो जीव, तिथे गेल्यानंतर ताजातवाना होतो. जणू जादूची कांडी फिरते. काय विशेष असते त्या गावात असे ? पण ते विशेष त्यालाच माहिती असते, ज्याने तिथे आपले बालपण घालवलेले असते. कवी अनिल भारती यांची ' खेड्यामधले घर कौलारू ..' ही रचना पहा. किती साधे आणि सोपे शब्द.. ! पण त्यातला गोडवा किती कमालीचा...! मालती पांडे यांनी गायीलेलं हे गीत आपल्यापैकी बऱ्याच जणांनी ऐकलंही असेल.

आज अचानक एकाएकी
मानस तेथे लागे विहरू
खेड्यामधले घर कौलारू.
पूर्व दिशेला नदी वाहते
त्यात बालपण वाहत येते
उंबरठ्याशी येऊन मिळते
यौवन लागे उगा बावरू
माहेरची प्रेमळ माती
त्या मातीतून पिकते प्रीती **क्रमशः**




## हितगुज

पुष्प ७१वे

**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

### सांस्कृतिक अधःपतन आणि ऱ्हास


आजकाल भाषणे, लेखातून नेहमी चिंता व्यक्त केली जाते आहे की सर्वत्र सांस्कृतिक ऱ्हास होतो आहे व त्याचे सर्वाधिक दुष्परिणाम युवा वर्गावर दिसून येत आहेत. चंगळवाद, व्यसनाधीनता, अपराध, क्रूरता, स्वैराचार, भ्रष्टाचार, बेइमानी, फसवणुक, लूट, हत्या असे अनेक दानवी चेहरे या सांस्कृतिक अधःपतनाचे आहेत. मनुष्य व समाज सांस्कृतिक दृष्ट्या निरोगी असेल तरच ज्ञानाची विधायकता व उत्कर्ष, आनंदमयता सर्वांना अनुभवता येते. भांडवलशाहीचे वर्चस्व व सर्व विकास घटकांवर त्यांचा ताबा यातून मूल्य-विघटन व मूल्य-विनाशाची प्रक्रिया वेग घेत असते. आजकाल भांडवलशाहीच्या माध्यमातून जीवनात 'धनप्राप्ती' हेच महत्त्वाचे व अग्र क्रमांकाचे मूल्य बनले आहे. विना मेहनतीने, कपट कारस्थानाने, छळत्रासाने, मोहवशतेने, अप्रामाणिकता व चातुर्याने, भ्रष्टाचाराने व अनैतिकतेने वाटेल तेवढा पैसा मिळवण्याची जणू स्पर्धा लागली आहे. पैसा व त्याचे प्रदर्शन ही तथाकथित प्रतिष्ठेची अट आहे. धनप्राप्तीसाठी वाटेल ते केल्यावर त्याचे समर्थन करण्याचे कौशल्य व ही अशा व्यक्तींनी सहज मिळवले आहे जे काही चुकीचे करीत आहेत, त्याची जाणीव बोथट करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अशा व्यक्तींकडून धर्म कार्ये, दानधर्म ही होत आहे. या करामती साहजिकच सामान्य माणसाला भुरळ पाडतात व तो सर्रास त्यांचे अनुकरण करून येनकेन प्रकारणे धनप्राप्तीसाठी प्रयत्न करतो, त्यातून शोषण, अराजकता, बेईमानी, भ्रष्टाचार इत्यादींची मोठी साखळी तयार होत रहाते. मग अशा व्यक्ती व्यवसाय मूल्य, व्यापारमूल्य, उद्योगमूल्य अशा शब्दावली रूढ करतात. तसे पाहता जीवनात व समाजात वेगवेगळ्या क्षषत्रांची वेगवेगळी मूल्ये कधी ही नसतात. झोपडी ते राजमहाल जीवनमूल्य सर्वत्र एकच असते. जीवनमूल्यांची परस्परांशी सुसंगत, समन्वित वीण म्हणजे संस्कृती होय. मानव समाजाच्या ऐतिहासिक विकास प्रक्रियेत समाजाने कल्याणकारी, मंगलमय जीवनमूल्ये निर्माण केली, ती आचरणात आणून समाजातील सर्वांना मानसिक, बौद्धिक विकासाची सुस्थिती निर्माण करून दिली. सामान्य जनसमूह हे करीत असतो. त्यामुळेच अनेकानेक बाह्य बदल व घडामोडींच्या युगात ही लोकसंस्कृती लोकजीवनात युगानुयुगे प्रवाहित होत राहिलीआहे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## श्री साईबाबा

आधुनिक केसरी

जे साईभक्त झाले त्यांची नामस्मरणाने जन्म -मरणाची येरझारा चुकेल. सर्व पापे जळून भस्म होतील. श्री साईबाबांना सर्व रिध्दी,



अष्टौ सिध्दी प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे त्यांचे योगसामर्थ्य अद्वितीय होते. ते अंर्तज्ञानी योगी होते. ते प्रसंगी पर कायाप्रवेश करीत असत. त्यांना पूर्वजन्मीचेही ज्ञान होते. ते अजानुबाहू होते. श्री साईबाबा शेगावच्या गजानन महाराजांना आपले गुरुबंधू मानीत असत. गजानन महाराज शेगावी जेव्हा समाधीस्थ झाले, तेव्हा तेथे शिर्डीत श्री बाबा 'माझा गज निघून गेला' म्हणून शोक करू लागले. भक्तांना बाबा असे का करतात, हे समजेना. अखेर बाबांच्या अनावर शोकाचे कारण समजले.
बाबांना अंतज्ञानान ही गोष्ट समजली होती. श्रध्दा, सेवा आणि सबुरी हा साईबाबांचा सुवर्ण संदेश आहे. तो त्यांनी जगाला दिला. त्याशिवाय श्री बाबांनी अखेर भक्तांना शिकवण दिली. 'एकटे कधी खाऊ नका आणि अन्नदान करा. द्रव्यापाशी देव नाही व द्रव्य लोभला मोक्ष नाही' असे ते भक्तांना आवर्जून सांगत. त्यानुसार साईभक्त श्री साईबाबा उत्सवानिमित्त ठिकठिकाणी मोठमोठे भंडारे आयोजित करून अन्नदान करत असतात. आरंभीच्या काळात जाळी निमगावचे नानासाहेब डेंगळे यांनी पडक्या मशिदीत बाबांना नीट झोपता यावं म्हणून दीड फूट रूंद व चार हात लांब अशी एक लाकडाची फळी आणून दिली होती. बाबांनी त्या फळीच्या चार टोकाला जीर्ण चिंध्या बांधल्या व त्यांच्या सहाय्याने फळी वर अगदी मधोमध मशिदीच्या आढ्याला टांगली. फळीच्या चारही बाजूला पणत्या तेवत ठेवून ते फळीवर झोपत. ते कसे झोपतात व कसे उतरतात हे बघण्यासाठी रात्री माणसं जमत. पण हे कोडं कोणालाही कधीच उमगलं नाही.



आधुनिक केसरी

### मिळेल आनंद | विवेकाचे ||

गुणावगुणांची | करावी पारख ||
वेचावे निवडक | विचारांती ||१||
नको कधीकाळी | वासनेचा गंध ||
सात्विकांचा छंद | मज लागो ||२||
पाप-पुण्य भेद | जाणावा सकळ ||
ध्यानी कर्मफळ | ठेव मना ||३||
भाव समर्पित | जपावा अंतरी ||
ज्ञानचि उदरी | यावे जन्मा ||४||
संतसज्जनांचे | झाडावे अंगण ||
मिळेल आंदन | विवेकाचे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरूपण

आधुनिक केसरी

**संसार म्हणिजे सवेंच स्वार । नाहीं मरणास उधार ।**
**मापीं लागलें शरीर । घडीनें घडी ॥ १ ॥**
**नित्य काळाची संगती । न कळे होणाराची गती ।**
**कर्मासारिखे प्राणी पडती । नाना देसीं विदेसीं ॥ २ ॥**
**सरतां संचिताचें शेष । नाहीं क्षणाचा अवकाश ।**
**भरतां न भरतां निमिष्य । जाणें लागे ॥ ३ ॥**
**अवचितें काळाचे म्हणियारे । मारित सुटती येकसरें ।**
नेऊन घालिती पुढारें । मृत्युपंथे ॥ ४ ॥
होतां मृत्याची आटाटी । कोणी घालूं न सकती पाठीं ।

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**मृग कुण्डल में वास है,**
**वन वन खोजत धाय ।**
**साहेब तुमरे पास है, वाहर खोजन जाय**
**।।१२।।(स्वर्वेद तृतीय मण्डल षष्ठ अध्याय) ०३/०६/१२**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
**कस्तुरी मृगाच्या नाभीत सुगंधित कस्तुरी आहे, पण त्या सुगंधाला शोधत तो वनात फिरतो. त्याचप्रमाणे सर्वांचा स्वामी परमप्रभू तुमच्या जवळ अंतरात आहे आणि तुम्ही त्याला बाहेर शोधत आहात. सर्वव्यापी परमेश्वर सद्गुरूंच्या भेद साधनेद्वारे आत्म्यामधे प्राप्त अनुभवास येतो.**




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## देहबुद्धीच्या विस्मरणाकरिता नाम

आधुनिक केसरी

आपली आपल्याला ओळख करून घ्यायला नामस्मरण हाच उपाय आहे. परमेश्वराचा अंश प्राणिमात्राच्या ठिकाणी आहे खरा, पण हे जाणण्याची बुद्धी मात्र मनुष्यप्राण्याच्याच ठिकाणी आहे. पण त्याची अधोगती कशी होत जाते पहा : जीव मुळात परमेश्वरस्वरूपच असल्यामुळे प्रथम तो म्हणतो, "मी तो, म्हणजे परमेश्वरच आहे." इथपासून घसरत तो म्हणतो, "मी त्याचा आहे"; आणि अखेर "त्याचा माझा काही संबंध नाही" इथपर्यंत तो खाली येतो. याला कारण, देहबुद्धीचा पगडा वाढत वाढत शेवटी देह म्हणजेच मी, अशी आपली पक्की भावना होते. पण असे असले तरी मनुष्य अजाणता का होईना, पण खरे आहे ते ओळखल्यासारखेच बोलतो. जसे, एखाद्या इसमाचा स्नेही वारला तर लगेच तो इसम काय म्हणतो, 'आमचे स्नेही गेले !' याचाच अर्थ, समोर असलेल्या देहाला तो स्नेही समजत नसून, त्यात असणाऱ्या चैतन्याला, ईश्वरी अंशाला, तो खऱ्या अर्थाने आपला मित्र समजतो. म्हणजे अजाणता का



होईना, पण खरे तेच त्याच्या तोंडून बाहेर पडते. असे असले तरी स्वतःच्या बाबतीत मात्र तो ही जाणीव कायम राखीत नाही, आणि आपण म्हणजे देहच असे समजून तो वागत असतो. याला कारण, ज्याचा खरा 'मी' आहे त्याचा विसर पडून देहबुद्धी बळकट होत गेली. आता याला उपाय हाच, की ज्या मार्गाने मी खाली घसरत आलो त्याच मार्गाने उलट वर जाणे. तेव्हा पहिली गोष्ट म्हणजे, आता मी जो देहरूप बनलो आहे, तो मी त्याचा, परमेश्वराचा आहे अशी जाणीव जागृत करणे. याच जाणिवेची परमावस्था म्हणजे 'मी तोच आहे' ही भावना होणे. हे कसे साधावे ? तर ज्याच्या विस्मरणाने माझी ही अधोगती झाली त्याचे स्मरण करणे. स्मरणाला उत्तम साधन म्हणजे भगवंताचे नाव. म्हणजे, नामस्मरणाचा ध्यास ठेवला की मी खरा कोण हे कळेल आणि स्वतःची ओळख होईल. खरा परमार्थ हा असा अगदी सोपा आहे, पण तो योग्य मार्गाने केला पाहिजे. एखादी गाठ सोडविण्यासाठी कोणती दोरी ओढायची ते कळले पाहिजे, नाहीतर जास्तच गुंतागुंत होते, तसेच परमार्थाचे आहे. मी कोण हे जाणले पाहिजे, म्हणजे परमात्मा कोण हे आपोआप कळते. दोघांचे स्वरूप एकच आहे. म्हणजे दोघे एकच आहेत. परमात्मा निर्गुण आहे; तो जाणायला आपल्यालाही नको का निर्गुण, देहातीत व्हायला ? म्हणून देहबुद्धी सोडली पाहिजे. कोणतीही गोष्ट आपण जाणतो म्हणजे आपल्याला त्या वस्तुरूप व्हावे लागते; त्याखेरीज जाणणेच होत नाही. म्हणून परमात्म्याला जाणण्यासाठी आपल्याला नको का परमात्मरूप व्हायला ? यालाच 'साधू होऊन साधूस ओळखावे', 'शिवो भूत्वा शिवं यजेत्', असे म्हणतात.

## विकल्पनिरसन

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

तर ज्ञानामुळे सगळे कळते. पण ज्ञानरूपी जाणीव सुध्दा ज्यावेळी मागे रहाते,त्यावेळी स्वरूप साक्षात्कार होतो. मी आत्माचं आहे असा अनुभव येतो. त्यालाच विज्ञान म्हणतात. एक माणूस अमृत प्यायला म्हणून तो अमर झाला. लोकांना मरण कसे येतें बुवा असे तो म्हणाला, त्याप्रमाणे आत्मज्ञानी पुरूष सामान्य माणसाला म्हणतो की अहो मनुष्य मेल्यावर त्याला जन्म कसा येईल. सतत जागृत अवस्थेत रहावे. चांगल्या वाईटाचे अवलोकन करावे. भूतबाधा,विष चढते,गंडेदोरे, सामाजिक व्यवस्था बिघडेल,अनितीला प्रोत्साहन मिळेल असं कुणी वागू नये. खरेखोट्याची चाड असली पाहिजे व अन्यायाची चीड असली पाहिजे. सगळ्यांचा भावार्थ समजण्यासाठी आपण बध्द दशेत जावे.त्या दिशेची लक्षणे अंगी बाणली म्हणजे मग वाईट प्रश्नांना मनामध्ये जागाच शिल्लक रहाणार नाही. ज्ञानी पुरूषाची वृत्ति दृष्ट्या मधून बाहेर पडलेली असते. त्यामुळे बध्द माणसाच्या वृत्ती प्रमाणे ती दृश्यांमध्ये गुंतुन किंवा अडकुन पडत नाही. ज्याप्रमाणे भुकेलेल्या माणसाच्या अवस्थेची कल्पना पोट भरून तृप्त झालेल्या माणसाला येत नाही.




# प्रवरा पात्रात बोट बुडाली

## तीन जणांचा मृत्यू; तिघे दवाखान्यात दाखल : नगर जिल्ह्यात मोठी खळबळ

आधुनिक केसरी न्यूज

**किशोर पाटणी**

**शिर्डी :** नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील सुगाव जवळ असलेल्या मनोहरपुर गावा लगतच्या प्रवरा नदीच्या पात्रात २२मे रोजी सागर पोपट जेडगुले (वय २५), अर्जुन रामदास जेडगुले (वय १८) हे दोघे बुडाले होते. सागर जेडगुले यांचा मृतदेह सापडला होता. पण अर्जुन जेडगुले यांचा मृतदेह न सापडल्याने २३मे रोजी सकाळी ६,३०वाजेच्या सुमारास धुळे येथील राज्य आपत्ती प्रतिसाद (एसडीआरएफ) चे पाच जवान व एक स्थानिक सह बोट घेऊन नदीपात्रात शोध सुरू असताना नदीच्या पात्रात असलेल्या पाण्याच्या भवरात अचानक बोट उलटुन मोठी दुर्घटना सकाळी घडल्याने नगर जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे घटना घडताच तात्काळ प्रांताधिकारी शैलेश कुमार हिंगे उपविभागीय अधिकारी सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली शोध सुरू करण्यात आला. त्यानंतर माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी देखील घटनास्थळी भेट देत घटनेची माहिती घेतली यात पोलीस कर्मचारी पंकज पंढरीनाथ पवार व अशोक हिम्मतराव पवार व स्थानिक एक तरुणांवर औषध उपचार दवाखान्यात सुरू असुन या दुर्घटनेत पोलीस उपनिरीक्षक प्रकाश नाना शिंदे पोलीस कॉन्स्टेबल राहुल गोपीचंद पवार चालक वैभव सुनिल वाघ यांचा मृत्यू झाला असून इतरांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. घटनेनंतर नदीपात्रा लगत मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. पोलीस पाटील राजेंद्र शिंदे यांनी सांगितले की सकाळी ६,३०वाजता या पथकाने नंदिपात्रात प्रवेश केला व अवघ्या काही मिनिटांत ६,४५ दरम्यान सकाळी हि घटना घडली असल्याचे सांगताना हळहळ व्यक्त केली व अशी घटना घडायला नको होती हे सांगताना त्यांना अश्रू अनावर झाले.





# खडकपूर्णा जलाशयात तीन बोटी उडवल्या

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** संत चोखा सागर खडकपूर्णा जलाशयातून वाळू चोरी करणाऱ्या तीन बोटी व इतर साहित्य जिल्हा शोध व बचाव पथक व महसूल च्या संयुक्त मोहिमेत जिलेटिन ने उडवण्यात आल्या. मागील आठवड्यात राबविलेली मोहीम फ्लॉप शो झाल्यानंतर काल रात्री उशिरापर्यंत तीन बोटी, वाळू उपसा करणारे पाईप्स व इतर साहित्य नष्ट करून महसूल विभागाने धडक कारवाई केली.

जिल्हाधिकारी बुलढाणा व उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच प्रवीण धानोरकर तहसीलदार सिंदखेडराजा यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय शोध व बचाव पथकाच्या माध्यमातून खडकपूर्णा धरणामध्ये मौजे चिंचखेड येथे वाळूचे अवैध उत्खनन करणाऱ्या तीन बोटी व त्यांचे साहित्य आणि पाईप्स नष्ट करण्यात आले. सदरील कामगिरी परीविक्षाधीन नायब तहसीलदार प्रांजल पवार यांच्या उपस्थितीत,मंडळ अधिकारी रामदास मांटे,मंडळ अधिकारी ईप्पर,श्री.वायडे व तलाठी सरिता वाघ, ज्योती लोखंडे, पी.डी. बुरकुल, पी.टी जायभाये, एस.एस.वाकोडे, एस. टी. हांडे, एम.के.जारवाल, एस.ए.देशपांडे,आकाश खरात, तेजस शेटे, कोतवाल विठ्ठल हरणे, कोतवाल आकाश माघाडे,वाहन चालक एन.बी.उबाळे व वाहन चालक चव्हाण यांनी पार पाडली. सदरील कारवाई दरम्यान बोटींचा चा शोध लावण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथील आपत्ती व्यवस्थापन च्या शोध व बचाव पथकाचे प्रमुख ए. एस. आय. तारासिंग पवार व त्यांचे सहकारी एच. सी. रशीद पटेल, श्रीकांत गाडे, संदीप पाटील, अमोल वाणी, गुलाब सिंग राजपूत, सलीम बर्डे, प्रदीप सोनवणे व संतोष साबळे यांनी परिश्रम घेतले. मागील आठवड्यात वाळू चोरी करणाऱ्या बोटीची शोध मोहीम घेण्यासाठी स्वतः तहसीलदार वैशाली डोंगरजाळ बोटी द्वारे जलाशयात उतरल्या तब्बल चार तास चाललेल्या शोध मोहीमे दरम्यान बोटीनचा पाठलाग करताना जिल्हा बचाव शोध पथकाची दमछाक झाली. ऐन वेळेवर जोरदार पावसामुळे सदर मोहीम विस्कटली आणि महसूलच्या पथकाला खाली हात परतावे लागले होते.मात्र काल राबविण्यात आलेली संयुक्त मोहीम तीन बोटी नष्ट करून फत्ते करण्यात आली.



# पारोच्या स्मृतीदिनी इतिहासप्रेमींचे अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अजिंठ्याच्या ऐतिहासिक वैभवात भर घालणाऱ्या पारोच्या 168 व्या स्मृतीदिनानिमित्त स्थानिक इतिहास प्रेमींनी अभिवादन केले. स्थानिक आदिवासी कन्या पारो व अजिंठा लेणीच्या संवर्धनासाठी इंग्रज शासनाने नियुक्त केलेला इंग्रज अधिकारी रॉबर्ट गिल यांची देश, भाषा, प्रांत यांना भेदणारी अजरामर प्रेम कहाणी इतिहासात प्रसिद्ध आहे. पारोचा मृत्यू झाल्यानंतर तिच्याविषयी असलेल्या अत्यंत प्रेमापोटी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रॉबर्ट गिल याने 23 मे 1856 साली अजिंठा येथील पोलीस ठाणे परिसरात तिची कबर बांधून तिच्या कबरीवर TO THE MEMORY OF MY BELOVED PAROO, WHO DIED 23RD MAY 1856 असे कोरले आहे. दरवर्षी या दिवशी अनेक इतिहास प्रेमी पारोच्या कबरीवर अभिवादन करण्यास येतात. अजिंठा येथील स्थानिक इतिहास प्रेमींनी सकाळीच पारोच्या कबरीला पुष्पहार, फुले वाहून अभिवादन केले. स्थानिक इतिहास संशोधक विजय पगारे यांनी पारोच्या स्मृतीला उजाळा दिला. या वेळी अजिंठा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शरद वाघुले, स्थानिक इतिहास संशोधक विजय पगारे, बिट जमादार संदीप कोथळकर, संदीप मानकर, अरुण चव्हाण देशमुख ,राष्ट्रीय संघटक अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती सतीश चव्हाण, संजय जाधव, मनोहर घुले, शेख आसिफ, शेख नईम, राहुल अंभोरे, संजय कसारे यांच्यासह इतर नागरिक उपस्थित होते.

**पारोच्या कबरीला विकासाची झालर :** पारोच्या स्मृती स्थळावर सध्या मोठ्या प्रमाणात विकास कामे सुरु असून इतिहास प्रेमींनी समाधान व्यक्त केले आहे . याठिकाणी पर्यटकांना स्वच्छता गृह, गार्डनिंग, कबरीला संगमरवरी आच्छादन, स्वागत कमान, सुरक्षा रक्षक कबीन, पार्किंग झोन आदी कामे प्रगती पथावर आहेत . सदर कामे जोड रस्ते व पारोची कबर योजने अंतर्गत होत असून कबरीकडे येणारा रस्ता, व गावातील अंतर्गत रस्ते सुद्धा पर्यटन विभागाने बांधून द्यावे अशी मागणी इतिहास प्रेमींनी केली आहे .

# श्री साईनाथ रुग्णालयासाठी ५१ लाख रुपयांचे थुलियम फायबर लेजर मशिन दान

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** रुग्णसेवा हिच ईश्वरसेवा" या साईबाबांचे शिकवणीतुनच श्री साईबाबा संस्थानने श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल सुरु केले. विविध आजारावरील रुग्णांना येथे मोफत उपचार केले जातात वर्षाकाठी लाखो रुग्ण उपचारासाठी येत असतात अनेक साईभक्त त्यांचे इच्छेनुसार श्री साईबाबा संस्थानला विविध माध्यमातुन सेवाभाव डोळ्यासमोर ठेवून देणगी देत असतात.देणगीदार साईभक्त सजिंव गोयल रा.मोहाली पंजाब यांनी रु ३१लाख ,८०हजार ,८००/-इतक्या किंमतीचे थुलियम फायबर लेजर तसेच रु १९ लाख ,५०हजार किमतीचे निमो लेजर हे मशिन असे सुमारे रु ५१ लाख रुपये किमतीचे दोन मशिन श्री साईनाथ रुग्णालयाला देणगी स्वरुपात दिले. सदर मशिनरीचे पुजन २३ मे रोजी सकाळी ११.०० वा श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांचे हस्ते करणेत आले. सदर मशिनरीमुळे रुग्णालयात विविध आजाराने ग्रस्त रुग्णांवर अत्याधुनिक पद्धतीने उपचार होणेस मदत होणार आहे. सदर कार्यक्रमाप्रसंगी श्री साईबाबा संस्थान रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ.प्रितम वडगावे, वैद्यकीय अधिक्षक डॉ.मैथिली पितांबरे, रुग्णालयातील जनरल सर्जन, डॉ.राम नाईक, डॉ.विद्या बो-हाडे, भुलतज्ञ– श्री.महेंद्र तांबे,डॉ. गोविंद कलाटे स्त्री रोग तज्ञ- डॉ.महेंद्र नेमनाथ, डॉ.निर्मला गाडेकर, आर्थो सर्जन- डॉ.विशाल पटेल कार्यालय अधिक्षक प्रमोद गोरक्ष, अधिसेविका सौ.मंदा थोरात, सिस्टर इन्चार्ज श्रीमती.नजमा सय्यद आदी उपस्थित होते. त्यानंतर या प्रसंगी बोलताना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राज्य भरातुन रुग्णालयात येणारे गोर गरीब व गरजु रुग्णांना सदरील मशिनरीमुळे जास्तीत जास्त अद्यावत पद्धतीने उपचार करणेसाठी येथील सर्व वैद्यकीय कर्मचारी यांनी प्रयत्न करावा असे आवाहन केले. याच बरोबर देणगीदार साईभक्तांचे आभार माणुन रुग्णालयासाठी लागणा-या विविध मशिनरी साईभक्तांनी रुग्णालय प्रशासन किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी संपर्क साधुन देणगी स्वरुपात देण्याचा प्रयत्न करावा असे आवाहनही केले. सदर कार्यक्रमा प्रसंगी डॉ.महेंद्र तांबे, सुरेश टोलमारे मंदा थोरात व प्रणाली कांबळे आदी उपस्थित होते



# ममता बॅनर्जी आक्रमक

आधुनिक केसरी

पश्चिम बंगाल सरकारने २०१० पासून ज्या जातींना ओबीसी प्रवर्गाचा दर्जा दिला होता, त्यांचा दर्जा काढून घेण्याचा निकाल कोलकाता उच्च न्यायालयाने बुधवारी (२२ मे) दिला. मात्र उच्च न्यायालयाच्या या निकालाला मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आव्हान दिले असून राज्यात ओबीसी आरक्षण जसे आहे, तसेच सुरू राहणार असल्याचे सांगितले. पश्चिम बंगाल मागासवर्गीय (अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींव्यतिरिक्त) (सेवा आणि पदांमधील रिक्त जागांचे आरक्षण) कायदा, २०१२" अंतर्गत दिलेले इतर मागासवर्गीयांचे (ओबीसी) आरक्षण रद्द करावे, यासाठी उच्च न्यायालयात जनहीत याचिका दाखल करण्यात आली होती. यावर सुनावणी झाल्यानंतर उच्च न्यायालयाने आपला निर्णय घेतला. पश्चिम बंगालमधील एका निवडणुकीच्या प्रचार सभेत बोलत असताना ममता बॅनर्जी म्हणाल्या, "उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी निकाल दिलेला मला कळला. अल्पसंख्याकांनी आदिवासी जमातीचे आरक्षण हिसकावले, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. पण हे कसं शक्य आहे. यामुळे संविधानाला तडा जाऊ शकतो. अल्पसंख्याकांनी कधीही आदिवासींच्या आरक्षणाला धक्का लावलेला नाही. पण भाजपासारखे लोक यंत्रणांना हाताशी धरून अपप्रचार करण्याचा प्रयत्न करत आहेत. उच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सांगितले की, २०१० नंतर अनेकांचा बेकायदेशीररित्या ओबीसी प्रवर्गात समावेश झालेल्यांची संख्या पाच लाखांच्यावर गेले आहे. उच्च न्यायालयाचा निकाल आम्हाला मान्य नाही. भाजपामुळे राज्यातील २६ हजार लोकांना नोकऱ्या गमवाव्या लागणार आहेत. त्यामुळे मी हा निर्णय मान्य करणार नाही. हा न्यायालयाचा निकाल नसून भाजपाचा निकाल आहे. त्यामुळे राज्यातील ओबीसी आरक्षण कायम राहणार, असे ममता बॅनर्जी यांनी ठामपणे म्हटले. ममता बॅनर्जी यांच्या या पवित्र्यावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, ममता बॅनर्जी उच्च न्यायालयाचा निकाल स्वीकारणार नाहीत, असे म्हणाल्या. घटनात्मक पदावर बसलेली व्यक्ती न्यायालयाचा निकाल मान्य नाही, असे म्हणू शकते का? मी याचा तीव्र शब्दात निषेध करतो. न्यायालयाचा निर्मय अमलात आणून, जे मूळ ओबीसी प्रवर्गातील लोक आहे, त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न आम्ही करू, असे ते म्हणाले. काँग्रेसने हीच पद्धत कर्नाटक आणि तेलंगणातही वापरली आहे. आम्ही त्याचाही निषेध केला आहे. धर्माच्या आधारावर आरक्षण दिले जाऊ नये, अशी भाजपाची भूमिका आहे. संविधान याला परवानगी देत नाही, असेही अमित शाह पुढे म्हणाले.

# राजे तुम्ही असता तर...



डॉ. बेनझीर शेख
संपर्क : ९५२७७३२९१९

आधुनिक केसरी

**तो तेजस्वी चेहरा,ते पाणीदार डोळे,ते धारदार नाक,ती रुबाबदार दाढी,तो मस्तकावर दिमाखात डोलणारा जिरेटोप, ती तडफदार चाल,ती तळपती तलवार,कुणालाही आपलसं करण्याची धमक त्या चेहऱ्यात होती.ते व्यक्तिमत्त्वच तसं रुबाबदार होतं. बलात्काऱ्यांचा कर्दनकाळ होते,जीवाला जीव देणारे ते आपले राजे होते.आपलेच काय पण दुश्मन ही आकर्षित व्हावे असे ते शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व.पहाता क्षणी कुणीही मोहीत व्हावे, शत्रू समोर नुसते नाव जरी उच्चारले तरी शत्रू जागेवरच गर्भगळीत व्हावा असा त्या नावाचा दरारा होता. जनतेच्या दुःखात रडणारा, रयतेच्या सुखात आनंद मानणारा तो बाणाच निराळा होता.**

रयतेच्या सुखासाठी झगडणारा तो जाणता राजा होता. पण आजचा महाराष्ट्र पाहून नजर खाली झुकत चालली आहे, हा महाराजांचाच महाराष्ट्र आहे का ?या एका प्रश्नाने मन सुन्न होतं आहे,काय हा जातीवाद,काय हे निष्पाप लोकांचा वापर करणारे गचाळ राजकारण,राजे तुमचा महाराष्ट्र हा नव्हता, तुम्ही निवडलेला मावळा हा नव्हताच ओ...

तुमच्या काळात जातियवादाला थारा नव्हता, तुमच्या सेनादलात सर्व समान होते,आपलेच होते.परका होता तो फक्त गनिम.राजे आज तुम्ही असता तर किती बरे झाले असते.या समाजाचे या महाराष्ट्राचे रुप काही वेगळेच असते.राजे तुम्ही आजचा महाराष्ट्र,आजचा मावळा बघून हळहळू नका.वाटल्यास तुम्ही परत या.आज तुमची खरच गरज आहे, तुमच्या महाराष्ट्राला, तुमच्या जनतेला, तुमच्या रयतेला पुन्हा तोच जाणता राजा हवा आहे,तोच बाणा हवा आहे,जनतेचा राजा हवा आहे.

राजे आज तुम्ही इथे नाही तरीही तुमची तगमग,तुमची तळमळ,तुमची अगतिकता जाणवतेय आम्हाला.

***माझा शिवबा....***
***काल शिवबा काळजीत होता***
***जगदंब चा जप चालूच होता....***
***मी उभारलेला महाराष्ट्र हा नव्हता***
***मी निवडलेला मावळा हा नव्हता....***
***माझ्या स्वराज्यात जातीवाद नव्हता,***
***माझा मावळा जातीवादी नव्हता....***
***माझा शिवबा तळमळत होता***
***स्वतःच्याच स्वराज्यात हळहळत होता....***
***माझा शिवबा आजही काळजीतच आहे***
***जगदंब चा जप चालूच आहे....***
***जगदंब जगदंब जगदंब....***

राजे शिवजयंतीला तुमच्या नावाखाली मद्य प्राशन करुन डिजेच्या तालावर बेधुंद नाचून धिंगाणा घालणारी भरकटलेली तरुणाई बघून स्वतः तुमची ही मान शरमेने खाली झुकत असेल ना?

मद्यधुंद अवस्थेत जय भवानी जय शिवाजी तुम्हाला व भवानी मातेला ऐकेरी नावाने संबोधणारे हे मावळे खरच तुमचा नकळत अपमान तर करत नाहीत ना? जय भवानी माता,जय शिवाजी महाराज किंवा भवानी माते की जय, शिवाजी महाराज की जय असे अभिमानास्पद वाटत नाही का?



छत्रपती शिवाजी महाराज की जय ही घोषणा आपल्याला ऐकायला किती गोड आणि छान वाटते ना? महाराज आपण कधीच भगवा, हिरवा निळ्याच्या वादात पडलाच नाहीत, निळा त्या वेळेस नव्हताच.आता तुमच्या नावाखाली भगवा फडकवला जातोय,पण तुम्ही कधी एका रंगाचे नव्हतातच. तुमच्यामधे भगवा हिरव्या सोबतच संपूर्ण इंद्रधनुष्यच सामावलेले होते. इतके अफाट मन होते आपले.पण आताची परिस्थिती पाहून तुम्ही नक्कीच हळहळत असणार.तुम्ही नक्कीच असा विचार करत असणार,आणि मनातल्या मनात असे पुटपुटत असणार.....

***होय, मी शिवबा बोलतोय....***
***होय, मी शिवबा बोलतोय***
***तुमचा लाडका राजा बोलतोय,***
***मला आता बोलू द्या***
***तगमग माझी व्यक्त करु द्या....***
***मी अजूनही पुतळ्यात अडकलोय***
***मला जरा तुमच्यात मिसळू द्या,***
***विचार तुमच्या मनात रुजवू द्या***
***कर्तव्य निष्ठा तुम्हाला शिकवू द्या....***
***माझा महाराष्ट्र धगधगतोय***
***जातीपाती मधे होरपळतोय,***
***कोणी तरी ही आग विझवा***
***मला तरी जन्म घेऊ द्या....***
***जातपात करणाऱ्या माझ्या***
***वाट चुकलेल्या मावळ्यांची***
***मलाच समजूत घालू द्या,***
***नसतीलच ऐकणार तर मग***
***मुंड्या त्यांच्या मलाच छाटू द्या....***
***शिवबा फक्त हिंदुंचाच होता ही***
***मावळ्यांनी माझीच केलेली बदनामी,***
***आता इथेच थांबू द्या***
***माझ्यावर लावलेला कलंक***
***आता मलाच पुसू द्या....***
***तुमच्यासाठी स्वराज्य स्थापणाऱ्याला***
***अश्या वादात गुंतवताय,***
***तुमचे हित जोपासणाऱ्याला***
***जातीपातीच्या राजकारणात***
***अडकवताय...***
***मी या वादात तडफडतोय***
***तुमच्या गैरमार्गाने मी चरफडतोय....***
***माझ्या नावाचा गैरवापराने मी***
***गुदमरतोय...***
***हिरवा भगवा निळा सोडून द्या,***
***मला मोकळा श्वास घेऊ द्या....***
***आता मलाच येऊन माझ्याच***
***आया बहिणींची अब्रू वाचवू द्या ,***
***माझ्याच मावळ्यांनी केलेल्या***
***बलात्काराची***
***मलाच शिक्षा देऊ द्या....***
***रांझ्याच्या पाटलासारख्या नराधमांचे***
***आता मलाच हातपाय कलम करु द्या....***
***तुमच्यातला शिवबा आता***
***मलाच येऊन जागा करु द्या,***
***नसतीलच ऐकणार तर मग***
***मुंड्या त्यांच्या मलाच छाटू द्या***
***मुंड्या त्यांच्या मलाच छाटू द्या....***

शिवाजी महाराजांसारखी दाढी वाढवून, रुबाबदार मिश्या ठेवून, मानेपर्यंत केस वाढवून,कानात बाळी घालून, माथ्यावर भगवी चंद्रकोर कोरुन शिवाजी महाराज बनता येते का? नाही, कदापि नाही.. त्यासाठी महाराजांचे आचार विचार या शरीराच्या धमन्यातून रक्तासोबत सळसळले पाहीजेत.त्यांचे व्यक्तिमत्त्व अंगात संचारले पाहिजे.पण ती अशक्य गोष्ट आहे. कारण शिवाजी महाराजांसारखे व्यक्तिमत्त्व जन्माला येण्यासाठी युगानुयुगे वाट पहावी लागते. ते व्यक्तिमत्त्वच वेगळे होते, ते रसायनच निराळे होते, एकमेवाद्वितीय होते, न भुतो ना भविष्यती, असा राजा पुन्हा होणे नाही.

खरच राजे आज तुम्ही असता तर ही अराजकता नसती, शेतकऱ्यांचे गळफास नसते, राजकारण्यांचे खोटे फास नसते, बलात्काऱ्यांचे हातपाय छाटले गेले असते, हा जातीयवादाचा नंगानाच नसता.आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मला या विषयावर या स्तरावर लिहीण्याची वेळच आली नसती. कारण तुम्ही हे सर्व घडूच दिले नसते, तुम्ही असते तर हे सर्व घडलेच नसते, कधीच घडले नसते.

# नशेच्या चक्रव्युहात तरुणाई झिंगाट



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**तरूण वय तसं धोक्याचच असतं अनेक धोके पार करत जीवन हित साध्य कराव लागत पण ज्या पद्धतीने नशेच साम्राज्य दिवसेंदिवस आपला विस्तार करत आहे त्या सावटाखाली तरूणाई दिसत आहे. त्याचे विपरीत परिणाम देखील समोर येत आहेत. आपल्या संस्कृतीचा प्रभाव दिवसेंदिवस कमकुवत होत चालला असुन पश्चिमात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव आपली मुळं घट्ट करत आहे. त्याच प्रमाणे आपण ज्यांना आपले तथाकथित आदर्श आयडॉल सेलेब्रिटी समजतो. त्यांच्या कडुन होत असलेल्या विघातक जाहिराती ज्या मध्ये समाज विघातक बाबींना मिळत असलेलं प्रोत्साहन आणि त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष तरूणाईच्या मनावर होणारा थेट परिणाम बाल मन दुषित कलुषित होण्यासाठी कारणीभूत ठरत आहे.**

त्याच बरोबर सोशल मिडिया, टिव्ही यावरील विघातक दृश्य पाहून अनेक मुलं त्यांचं हुबेहूब अनुकरण करत आहेत आणि तेही पालकांच्या परस्पर हि अंत्यंत गंभीर समस्या आहे.आणि हिच समस्या सगळीकडे आपले पाळंमुळं विस्तार करत असुन अगदी शहरापासून खेड्यापाड्यात पोहोचली आहे. हि चिंतेची बाब तर आहेच पण हा विळखा चक्रव्यूह वेळीच ओळखून योग्य मार्ग काढण्यासाठी प्रयत्न होण गरजेच आहे.नशेचा चक्रव्यूह भेदुन स्वतःच भविष्य घडविणे गरजेचं असतं.पण सध्याची तरूणाई हा नशेचा चक्रव्यूह भेदण्यासाठी कुठे तरी कमी तर पडत असल्याने चक्रव्यूह भेदण्या ऐवजी नशेतच झिंगांट होण्यात धन्यता मानत आहे हि शोकांतिका दुर्भाग्य म्हटलं तरी हरकत नाही.मुलांच्या मनात डोक्यात काय चाललंय हे सध्या तरी पालकांना ओळखन कहिस कठिण झाल आहे.काळ बदलतोय तसं सारं काही बदलतं आहे.सध्याची तरूणाई अनेक बाबतीत आई वडील पालकांना अनभिज्ञ तसंच अंधारात ठेवत आहेत. हि खुपच गंभीर आणि चिंतेची बाब आहे.जीवन उदेश समजला नाही तर भविष्य अंधकारमय होत असत. जीवनातील निर्णायक कालखंडात अध्ययन,उन्नती, अभ्यास ,जीवनाचा उत्कर्ष करायचा सोडून नशेच्या साम्राज्यात तरूणाईचा प्रवेश वाढला आहे.हा प्रवेश चिंता जनक असुन भविष्यातील परिस्थिती कठिण दिशेने जात आहे.शिक्षणाचं मंदिर समजल्या जाणाऱ्या शाळा महाविद्यालये, वरीष्ठ महाविद्यालय परिसरासह वेगवेगळे व्यवसायिक कोर्सेस व ट्युशन इत्यादी परिसरात नशेच साम्राज्य आपला विस्तार झपाट्याने करत असल्याने पालकांची चिंता वाढीस लागण स्वभाविक आहे.शिक्षणाच्या नावाखाली मुलं नशेच्या दुनियेत प्रवेश करून एका वेगळ्या चक्रव्युहात सापडत आहेत. जिथुन परत येण पुन्हा जवळपास शक्य होत नाही.जीवन उदयाला येण्या अगोदरच जीवन अस्ताच्या दिशेने जातंय आणि हे उघड्या डोळ्यांनी आपण पाहतोय हे संयुक्तिक ठरणार नाही म्हणून आपण फक्त साक्षीदार म्हणून पाहुण चालणार नाही.आपली मुलं ह्या भयानक चक्रव्युहात सापडणार नाहीत यासाठी आता प्रयत्न होण गरजेच आहे. चक्रव्युहात एकदा प्रवेश केल्यानंतर बाहेर पडण्याची शक्यता फार धुसर असते. देशाचं भविष्य समाजाचं वैभव असणारी तरूणाई आज स्वतःच अस्तित्व घडविण्यासाठी संघर्ष करण्या ऐवजी नशेच्या दुनियेत स्वतःच अस्तित्व शोधत आहे.नशा हि विघातकच आहे.स्वतःसाठी, कुटुंबासाठी,समाजासाठी,देशासाठी पण याचा चक्क मुलांना विसर पडला आहे.स्वतःच आयुष्य स्वतः उध्वस्त करण्यासाठी जणुकाही स्पर्धा लागली आहे.डोळ्यासमोर पाहु वाटणार नाही अशा पद्धतीने विकृती घडत आहेत.या नशेच्या चक्रव्युहात मुलं कशी अडकतात हे त्यांना स्वतःला सुद्धा कळत नाही. हा नशेचा विळखा एवढा प्रचंड मोठा आहे कि त्याच वास्तव स्वरूप समोर आलं तर अनेक पालकांचे पाय जमिनीवर उभा राहणार नाहीत.एवढी कठिण आणि बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. आई वडील पालक यांची परिस्थिती त्यांचं स्वप्न याशी मुलांना फार काही देणंघेणं उरलेले नाही.जीवनाच उदिष्ट काय तर खा प्या आणि मजा करा या पलिकडे जीवन नाही हि संकल्पना रूढ होत असल्याने फक्त चैन ,मौजमस्ती, म्हणजे आयुष्य या मानसिकतेतून बाहेर निघायला तरूणाई तयार नाही. मुळात जीवन काय आणि कशासाठी हि मानसिकता बदलली पाहिजे. आपलं जीवन व्यर्थ वाया घालविण्यासाठी नक्कीच नाही याची जाणीव झाली पाहिजे.आपले पालक आपले शत्रु नाहीत.जोपर्यंत आपण जीवन समजण्यासाठी समर्थ नाहीत तोपर्यंत आई वडील पालक यांच्या अज्ञेत राहिल पाहिजे त्या सोबतच जीवनातील छोटी मोठी प्रत्येक बाब ही आपल्या पालकांशी चर्चा केली तर जीवनात अनर्थ घडणार नाही.तसच किती हि विघातक शक्ति आपला प्रभाव आपल्यावर दाखवु शकणार नाही पण त्यासाठी आपण आपल्या पालकांच्या अज्ञेत राहिल पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पीक विम्याच्या रकमेची शेतकऱ्यांना प्रतीक्षा

## विमा कंपनीने बळीराजाच्या तोंडाला पुसली पाने : माजी सभापती चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यामध्ये सुमारे ४२ हजार ७५० हेक्टर क्षेत्र लागवडीखाली असून यावर्षी एका रुपयात पिक विमा काढण्याची शासनाने सुविधा उपलब्ध करून दिल्याने मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी पिक विमा काढला आहे. मात्र खरिपातील पिक विमा काढून आठ - नऊ महिने दूसरा खरीपाचा हंगाम तोंडावर आला तरी अजून पिक विम्याची रक्कम मिळाली नसल्याने शेतकरी त्रस्त झाले असल्याचे मत सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी व्यक्त केले आहे.ज्या ज्या शेतकऱ्यांनी विमा कंपनीकडे तक्रार केली होती.त्या शेतकऱ्यांना विमा देण्यात आला आहे. आणि ज्यांनी विमा कंपनीकडे तक्रार केली नाही. त्याच्या तोंडाला पाने पुसली आहे.

सोयगाव तालुक्यात ८४ गावे असून ६५ ग्रामपंचायतच्या माध्यमातून गावांचा विकासगाडा सुरू आहे. तालुक्यात सुमारे ४२ हजार 300 क्षेत्रावर पिकाची लागवड शेतकऱ्यांनी केली आहे. यावर्षी प्रथमच शासनाने पिक विमा काढण्यासाठी शेतकऱ्यांना केवळ एक रुपयाचा हिस्सा भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली होती. त्यावेळी पिक विमा भरताना पिक विमा केंद्रावर शंभर रुपयापर्यंत संचालकांनी शेतकऱ्याकडून रक्कम वसूल केली. विविध कागदपत्रे अपलोड करण्याच्या नावाखाली सदरील पैसे घेण्यात आले. परंतु त्याचाही भुर्दंड शेतकऱ्यांनी सहन केला. पिक विमा काढून आता आठ ते नऊ महिने झाले आहे मात्र अजूनही शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मिळाली नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहे.सोयगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात दुष्काळाचे संकट असताना पिक विम्याची रक्कम मिळणे अपेक्षित होते. परंतु अजूनही पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना मिळाली नसल्याने तालुक्यातील शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहे. मागील दोन वर्षापासून शेतकऱ्यांना पिक विमा वेळेवर मिळत नसल्याने पिक विमा बद्दल शेतकऱ्यात नाराजीचा सूर पसरला आहे. दुष्काळातून सावरण्यासाठी शेतकऱ्यांना तात्काळ पिक विमा त्यांच्या बँक खात्यात पाठवावा अशी मागणी आता शेतकरी करू लागले आहे.

सोयगाव तालुक्यात यावर्षी पावसाचे प्रमाण कुठे कमी तर कुठे अवकाळी असे असल्यामुळे संपूर्ण दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पिण्याच्या पाण्याचे संकट शेतकऱ्यासमोर उभे राहिले आहे. त्याचबरोबर पिक विमा काढलेली रक्कमही पिक विमा कंपनीने अद्याप दिली नसल्याने शेतकऱ्यांना दुष्काळ तेरावा महिना दिसू लागला आहे.



**विमा कंपनीत तुपाशी तर शेतकरी उपाशी** : पिक विमा कंपनीने शेतकऱ्यांचा एक रुपयाचा हिस्सा घेऊन केंद्र व राज्य शासनाकडून पीक विम्यापोटी मोठा हिस्सा विमा कंपनीला मिळाला आहे . मात्र एवढी रक्कम देऊनही शेतकऱ्यांना पीक विम्याचा एक रुपयाचाही फायदा झाला नसल्याने शेतकऱ्यात नाराजीचा सूर पसरला आहे . विमा कंपनी तुपाशी तर शेतकरी उपाशी अशी परिस्थिती निर्माण झाल्याचा शेतकरी आरोप करू लागले आहे .

**धरमसिंग दारासिंग चव्हाण, माजी सभापती सोयगाव**

## कविते...!

आधुनिक केसरी

पावलागणिक मजला
भावना भेटत जातात,
माझे श्वास गुदमरून
ओठांना शब्द फुटतात.

मीच तडफडू लागतो
माती-पाणी, घाम-उन्हात,
कत्पनांचे घोडे सुसाट
धावतात माझ्या मनात.

बोट धरणारी लेखनी
आणि थरथरणारा हात,
कागदावर उतरते
करूनी शब्दांवर मात.

मग ऱ्हदयातले शब्द हे
घायाळ होऊन जातात,
शेवटी माझेच श्वास हे
कवितेला जन्म देतात...!



- अय्युब पठाण लोहगांवकर,
- ता. पैठण.
- मो. ९७६४३५०३७४.



## ज्ञान प्रीमियर लीगच्या डे-नाईट क्रिकेटच्या महासंग्रामाला नेवासा येथे जल्लोषात प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** ज्ञान प्रीमियर लीगच्या डे नाईट क्रिकेटच्या महासंग्रामाला नेवासा येथे बुधवारी दि.२२ मे पासून जल्लोषात प्रारंभ करण्यात आला. ज्ञान फाउंडेशन व पसायदान स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेमुळे नेवासा तालुक्यातील नवीन पिढीतील खेळाडूंसाठी पर्वणी ठरणार आहे तसेच या स्पर्धेतून देशासाठी खेळणारे नवीन खेळाडू तयार होतील असा विश्वास युवा उद्योजक विजय गडाख यांनी शुभारंभ प्रसंगी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी बोलतांना व्यक्त केला

नेवासा शहरात श्री ज्ञानेश्वर कॉलेजच्या शेजारी असलेल्या मैदानात पहिल्यांदाच भव्य डे नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी झालेल्या उदघाटन प्रसंगी उद्योजक विजय गडाख,नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील, माजी नगराध्यक्ष सतीश पिंपळे,महेश मापारी,जितेंद्र कु-हे, सुनील साळुंके,योगेश रासने, सुधीर जायगुडे, भैय्या कावरे, रमेश पडूंरे,राहुल थोरात,नितीन खंडागळे,समीर शेख, सागर गंधारे, संदीप वीर, बंटी वाघ,महेश देवढे,डॉ लक्ष्मण खंडाळे व्यासपीठावर उपस्थित होते

यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांसह अंपायर-राजू डावखर,सतीश भालेराव,गोविंद गुंड, प्रक्षेपण प्रमुख साहिल चव्हाण,खेळाडूंचा सन्मान अस्मिता पवार, आर्या जगताप, समालोचन-शाहरुख पठाण, शेरखान पठाण यांचा ही सत्कार करण्यात आला.उपस्थित मान्यवरांनी क्रिकेटच्या या महासंग्रामाला शुभेच्छा दिल्या. प्रा.देविदास साळुंके सर यांनी यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या स्पर्धेत एकूण आठ संघ सहभागी झाले आहेत त्यात मक्तापूर ब्लास्टर-मक्तापूर (संघमालक-भरत भाऊ काळे,मनोज झगरे, कर्णधार-संदीप वाघमारे), श्री वॉरियर्स-नेवासा फाटा (संघमालक-प्रतापराजे हांडे, कर्णधार-अशोक पानखडे),दहिवळकर सराफ- नेवासा फाटा (संघमालक-विजय शेठ दहिवाळकर,रितेश भाऊ कराळे,कर्णधार-नितीन बोरुडे), जनता गॅरेज- नेवासा (संघमालक-धनु भाऊ काशीद,राहुल थोरात, कर्णधार- प्रशांत वाघ),डॉक्टर इलेव्हन- कुकाणा (संघमालक-सुनील तांबे, डॉ. मनोज शिंदे, कर्णधार-भूषण मिरपगार),छत्रपती शिवाजी किंगज ब्लास्टर-नेवासा फाटा (संघमालक- डॉ. शिवाजी गोरे,कर्णधार-डॉ. शंकर वंजारी),रॉकस्टार अँड सुदर्शन क्रिकेट अकॅडमी-नेवासा(संघमालक- आसिफ शेख, रिजवान खान,कर्णधार-अशोक कुदळे),शिवम फायटर - नेवासा बु. (संघमालक-सुधीर जायगुडे, कर्णधार-अमोल शिंदे)या संघांनी सहभाग घेतला आहे.


ही स्पर्धा खेळण्यासाठी नेवासा तालुक्यातील १४२ खेळाडूंनी ऑनलाइन पद्धतीने फॉर्म भरले होते आणि त्यांना लिलाव बोली पद्धतीने प्रत्येक संघात सामाविष्ट करण्यात आले.या स्पर्धेचे बक्षीसदाते ज्ञान फाऊंडेशन, नेत्रा लॉन्सचे अनिल डौले, प्रकाश जगताप, विकास फर्निचर व शेरा गोल्डचे कमलेश ओस्तवाल,जहीर बागवान हे असून शिवशक्ती आईस्क्रीम, मारुतराव घुले पाटील पतसंस्थेचे चेअरमन नंदकुमार पाटील, कांदे चष्मावालाचे स्वप्निल कांदे,साई श्रद्धा ब्रिक्सचे आदित्य खंडाळे, लक्ष्मी मंगल कार्यालय, संदीप लाईट डेकोरेशन, डिझायनर सागर गंधारे,आशा भेळचे विजय गायकवाड, अनिल डिजिटल, नवनाथ वीट उत्पादक ॲड सप्लायर्स, ऋषिकेश बनकर,जगदंब स्पोर्ट्स ॲड टी-शर्ट प्रिंटचे किशोर पठाडे, हॉटेल दत्तप्रसादचे अमोल सुरोशे, जगदंबा इलेक्ट्रिकल्सचे अनिल शिर्के, एकता सायकल मार्टचे सतीश गायके,मापारी मिल्क ॲड केक शॉपचे प्रवीण मापारी, स्वस्तिक प्युरिफायरचे अनिल शिंदे, मेनका सायकल मार्टचे अन्सार भाई बागवान, सोनल ॲग्रो सीड्स- कुकाणा,जी. ए. विखोना, शिवा मोरे, अजय कोळेकर, सौ. शर्मिला शिंदे यांचे सौजन्य लाभले आहे. तसेच ज्ञान फाउंडेशनचे सदस्य, गुड मॉर्निंग क्रिकेट क्लबचे सदस्य ,पसायदान स्पोर्ट्स क्लबचे सदस्य, सुदर्शन क्रिकेट अकॅडमीचे सदस्य,ज्ञानाई डिजिटल यांचे मोलाचे सहकार्य लाभलेले आहे.

## संत सेना महाराज बांधकाम आराखड्याची गुरुवर्य श्री भास्करगिरी बाबांकडून पहाणी

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** येथे पतंजली पार्क येथे बांधले जात असलेल्या श्री संत शिरोमणी सेना महाराज यांच्या मंदिर बांधकाम आराखडयाची देवगड येथे गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांकडून पहाणी करण्यात येऊन महत्वपूर्ण सूचना करण्यात आल्या.

संत शिरोमणी सेना महाराज यांचे नेवासा येथील मंदिराचे काम गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून हभप सचिन महाराज पवार हे या मंदिर बांधकामासाठी सर्व पदाधिकाऱ्यांना बरोबर घेऊन काम पहात आहे,मंदिर बांधकाम समितीने नुकतीच देवगड येथे जाऊन गुरुवर्य बाबांची भेट घेऊन मंदिर बांधकाम नकाशा बाबांना दाखवला व आत्तापर्यंत जमा झालेली रक्कम व झालेला खर्च हा सगळा हिशोब देखील बाबांसमोर सादर केला. याबाबत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांनी महत्वपूर्ण सूचना करून मंदिर आराखडयाबाबत समाधान व्यक्त केले.यावेळी गायनाचार्य हभप सचिन महाराज पवार, आप्पासाहेब गायकवाड,भास्कर वाघमारे, विलास कोरडे, प्रशांत औटी,माऊली बोरुडे उपस्थित होते.



## दुष्काळी परिस्थितीत फळबाग वाचवण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील, मौजे पळसखेडा येथे दुष्काळी परिस्थितीमध्ये फळबाग वाचवण्याची मोहीम अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमामध्ये डॉ. डी. बी. कच्छवे यांनी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यामध्ये ठिबक, तुषार सारख्या आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर, मडका सिंचन पद्धतीचा वापर, हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा वापर, तसेच आच्छादनाचा वापर, खोडास बोर्डो पेस्ट लावणे, शेततळ्याच्या पाण्याचे बाष्पीभवन थांबवणे, केओलीन व 13:00:45 या रसायनाचा वापर करून दुष्काळात फळबागा वाचवणे इत्यादी. त्यानंतर तालुका कृषी अधिकारी श्री. एम. एन. शिसोदिया यांनी आगामी खरीप हंगाम पेरणीच्यादृष्टीने पूर्वनियोजन बाबत शेतकऱ्याला मार्गदर्शन केले. त्यामध्ये जमीन निवड, जमिनीची पूर्वमशागत तसेच सिंचनाचे नियोजन, त्यानंतर पिकाची फेरपालट करण्याच्या दृष्टीने पिकाची निवड करणे, आंतरपिकाचा समावेश करणे, तसेच पिकाचे आपल्या जमिनीस व पाण्याच्या उपलब्धतेनुसार योग्य वाण निवड करणे, त्यानंतर पेरणीच्या अगोदर बियाण्यास रोग होऊ नये म्हणून बुरशीनाशकाची तसेच कीटकनाशकांची व जैविक खतांची बीज प्रक्रिया करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. तसेच लागवडीनंतर विविध तणनाशकाबाबत माहिती दिली. या प्रसंगी मंडळ कृषी अधिकारी रमेश गुंडीले, पर्यवेक्षक चौधरी, कृषी सहाय्यक श्रीमती अहिरराव व चौरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.



## सावळदबारा परिसरात केवायसी केली तरच मिळणार सबसिडी : मो. आरिफ मो. लुखमान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा व परिसरात डाभा, मोलखेडा, हिवरी, चारुतांडा, टिटवी पळसखेडा नांदा तांडा, घाणेगाव तांडा, देव्हारी नागरिकांनी केवायसी करुन घ्यावी असे आवाहन जर -जरी इंडियन ग्रामीण ग्रस वितरचे व्यवस्थापक मो आरिफ मो लुखमान यांनी केले आहे. परिसरातील गॅस कार्डधारक आहेत. त्यापैकी बरेचं के वाय. सी झालेल्या आहेत. तर काही गॅस कार्ड धारकची के. वाय.सी करणे बाकी असुन त्यांनी तत्काळ केवायसी करून घ्यावी नाही तर उज्वला गॅस कार्डधारकांची ३०० रुपये सबसिडी मिळणार नाही ही सबसिडी बंद होईल त्यासाठी लवकर प्रत्येक गॅस कनेक्शन धारकांनी आपली केवायसी लवकरात लवकर करून घ्यावी असे आवाहन मो आरिफ मो लुखमान यांच्याकडून करण्यात आले आहे.



# स्वर्गाच्या झाडावर पशुबळी; पोलीस प्रशासन नरबळी जाण्याची वाट पाहतयं काय...?

## वर्दळीच्या रस्त्यावर स्वर्गाच्या झाडावर आगोदर लिंबू, दाबन, खिळे आता चक्क पशूबळी

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यातील वाशी या शहराकडे जाणाऱ्या प्रमुख रस्ता वाशी फाटा जवळ अगदी रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर या अगोदरच निसर्गामध्ये विविध गुणधर्म असलेल्या स्वर्गाच्या झाडावर अंधश्रद्धेच्या नावाखाली आज पर्यंत विविध विविध प्रकार करण्यात आले आहेत.
त्यामध्ये या झाडाला विविध ठिकाणी खीळे,दाबन ठोकलेले आहेत. त्यात लिंबू लावणे बिबे बसवणे असे विचित्र केळी सोन्या प्रकार या अगोदर वर्षभरापासून सुरु आहेत.

जादूटोणा,भानामती याबाबत दैनिक आधुनिक केसरीने बातमी प्रकाशित करून संबंधित बांधकाम विभाग व पोलीस प्रशासनाचे लक्ष वेधले होते. तरीही संबंधित बांधकाम विभागाने किंवा पोलीस प्रशासनाने कुठलीही दखल घेतलेली आज पर्यंत दिसून आले नाही. पोलीस प्रशासनाच्या न पाहण्याच्या दृष्टीमुळे अंधश्रद्धेचे पाळेमुळे वाशी तसेच ग्रामीण भागात दिवसेंदिवस वाढतं चालले असल्याचे दिसून येत आहे.


आधुनिक केसरी
05 Nov 2023
https://www.adhunikkesari.com/epaper/news/36638/6546426b4aafa

स्वर्गाच्या झाडावर भानामती!

पोलीस प्रशासनाकडून मात्र बघ्याची भूमिका

आधुनिक केसरी न्यूज

सचिन कोरडे

धाराशिव : जिल्ह्यातील ग्रामीण भागात अजूनही भूतबाधा, भानामती, जादूटोणा, यासारखे प्रकार सुरूच आहेत. बुध्दीहिन अश्या अशिक्षित, अज्ञानी लोकांमुळे रस्त्यालगत व शासकीय वनपरिक्षेत्रातील अनेक वृक्ष जादूटोण्याच्या या प्रकाराला बळी पडत आहेत. राज्यात जादूटोणा विरोधी कायदा लागू झाला तरीहि असे प्रकार होत असतील तर त्याविरुद्ध थेट पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद केला जातो. पण जिल्ह्यातील वाशी शहरातील पोलीस प्रशासन मात्र या भानामती, जादूटोणा याबाबत बघ्याचीच भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे. दरवर्षी जास्तीत जास्त वृक्ष लागवड उद्दिष्ट ठेवून वर्षाला वृक्ष लागवडीसाठी व जाहिरातीवर अमाप खर्च केला जातो. तर इकडे धाराशिव जिल्ह्यात

आयुर्वेदामध्ये खूप महत्व : डिंक आणि कडू, सुगंधी पानांमध्ये औषधी गुणधर्म असल्याने झाडाचे औषधात अनेक उपयोग आहेत. झाडाची साल एक ज्वर आहे आणि दमा, ब्रॉंकायटिस आणि आमांश वर उपचार म्हणून वापरली जाऊ शकते प्रसूतीनंतर वापरल्या जाणाऱ्या शक्तिवर्धक म्हणून पाने आणि साल देखील चांगली प्रसिद्ध आहेत. पानांचा रस आणि ताज्या सालाचा वापर नंतरच्या वेदनांवर उपाय म्हणून केला जातो. निसर्गात एवढे विशेष महत्व असणाऱ्या या झाडाला सडलेल्या बुद्धीच्या, भोंदूगिरी करणाऱ्या व्यक्तीकडून झाडांवर हजारोंच्या संख्येने मोठे-मोठे खिळे मारून त्यावर लिंबू, बिबा हे लटकवले जात आहे. विशेष म्हणजे वर्दळीचा रस्ता असून त्यात रस्त्यावर भले मोठे असणारे हे स्वर्गाचे झाड आणि त्यावर हजारो खिळे, मोठ्या सुया ठराविक दिवस वार वेळ ठरवून मारल्या जातात.

जादूटोणाविरोधी कायदा काय आहे?
राज्यात जादूटोणा विरोधी आणि अंधश्रद्धा निर्मूलन कायदा लागू झाला आहे, या कायद्यानुसार मांत्रिक किंवा अन्य एखाद्या व्यक्तीमार्फत अघोरी उपचार करणे, भानामती करणे, काळी जादू करणे असे प्रकार निर्दशनास आल्यास त्याविरुद्ध गुन्हा नोंद होत होतो.

आयुर्वेदात अत्यंत उपयुक्त असणाऱ्या तसेच शेतीसाठी व नदीकाठी ही त्याची योग्य भूमिका

वाशी ते वाशी फाटा हा वरदळीचा रस्ता रोज सकाळ-संध्याकाळ ज्येष्ठ नागरिक, मुले -मुली चांगल्या आरोग्यासाठी या रस्त्यावरून धावत असतात. याच रस्त्याच्या कडेला चिटकूनच त्या स्वर्गाच्या झाडावर चक्क मेंढी ला मारून उलट लटकवलेल दिसुन येत आहे. संबंधित प्रकारामुळे या भागात व येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांमध्ये प्रचंड भेटीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे आता तरी पोलीस प्रशासनाने या विषयी गंभीर होणे गरजेचे आहे. खरंच हा प्रकार भानामती आहे की,जादूटोणा आहे किंवा कोणी समाजकंटक ने मुद्दाम असे कृत्य केले आहे.याबाबत पोलीस प्रशासनाने तात्काळ तपास करून संबंधित कडक कारवाई करावी. या किळस वाण्या प्रकारामुळे भयभीत झालेल्या नागरिकांच्या मनातून कायमची भीती नष्ट करावी असेच नागरिकांमधून बोलले जात आहे.
राज्यात जादूटोणा विरोधी कायदा लागू झाला तरीहि असे प्रकार होत असतील तर त्याविरुद्ध थेट पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद केला जातो.पण जिल्ह्यातील वाशी शहरातील पोलीस प्रशासन मात्र या भानामती,जादूटोना याबाबत बघ्याचीच भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे.



## तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती गोळेगाव येथे मोठ्या उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे**


**उमरी :** तालुक्यातील गोळेगाव येथे दिनांक 23 मे गुरूवार रोजी सकाळी 10 वाजता तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती बुद्ध जयंती मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या जयंती मंडळाचे अध्यक्ष संजय डोंगरे उपाध्यक्ष अनिल बामणे, मंगेश बामणे गोविंद बामणे हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अशोक बामणे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष गोविंद पाटील गोळेगावकर यांसह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण दत्तात्रय वराडे ( पो. पा. गोळेगाव) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एका लहान मुलीने भगवान गौतम बुद्ध यांच्या जीवन चरित्रावर सुदंर असे भाषण केले. समता, शांती, बंधुभाव, प्रज्ञा, शील, करुणा आणि विवेकबुद्धीचा शाश्वत मार्ग मानवजातीला दाखवणाऱ्या तथागत भगवान गौतम बुद्धांची आज 2568 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी उपस्थित मान्यवर गोविंद पाटिल गोळेगावकर, दत्तात्रय वराडे (पो. पा. गोळेगाव) दत्ता यमलवाड ( उपसरपंच) रमेश पा. सावंत ( ग्रा. पं.स गोळेगाव) शिवकुमार भंडरवाड, ( ग्रा. प. स गोळेगाव) हाणमंत यमलवाड, देविदासजी मुंडफळे, मुनिराज क्षीरसागर, बाबू बोईनवाड आदी मान्य वर उपस्थित होते.

## पाचशे ते पन्नास हजारापर्यंतचा सट्टा; कुणाचा खिसा गरम तर कुणाचा नरम होणार ?

आधुनिक केसरी न्यूज

**महेश तारमळे**

**ठाणे :** भिवंडी लोकसभेच्या निवडणूकीत कपिल पाटिल व महाविकास आघाडीत लढत झाली,तर बाळ्यामामाची उमेदारीत जागा कॉंग्रेसची तर उमेदवारी राष्ट्रवादितून लढविण्यात आली,अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांनी देखील जातिच्या नावावर आपलं कार्डचालविण्याचा प्रयत्न केला ? असता ईतर अनेक ईच्छूक उमेदवाराना आपला पाठिबां देतो असे काहीनी भरीस घातले व काही आमदारांनी या दोघांनाही पाठिंबा देण्याचे अस्वासन देत सकाळी एकाचा व दुपारी दुसऱ्यांचा प्रचार करीत पद्धतशिरपणे गंडविल्याचा प्रकार घडल्याची खात्री लायक चर्चा आहे, १०२०५२० म्हणजे ५१:१८ निम्यावर मतदान झाले असता येथील राजकारणात झालेली उलथा पालथ पाहता या वेळेस हि निवडणूक भलेही तितकीच महत्वाची बनली असली तरी गावगल्ली,,चौक,नाक्यानाक्यावर कोण बाजी मारणार ही चर्चा रंगतेय नव्हे तर एकमेकांच्या कार्यकर्त्यांनी पाचशे ते पन्नास हजारापर्यतच्या पैजा लावल्या जात असल्याचे बोलले जातेय,ईतकेच नव्हे तर या उमेदवारा सोबत दिवसा कोण व रात्री ? कोण? नेते होते सकाळी एकीचे व दुपारी दुसऱ्यांचे काम करून कसे गंडविले गेल्या सारखी माहिती एकत्रीत करून किती मताधिक्य मिळेल याच गणीत मांडून विजयाची छातीठोक पणे खात्री बाळगुन कपिल पाटील व बाळ्या मामा याच्यात पैजा लावणारे आपल्या ऐपती प्रमाणे दुचाकी,ते ५०० शे पासून पंन्नास हजाराच्या पर्यतचा सट्टा लवित असून यात दोनवेळा लाखाच्या फरकाने विजय मिळविलेले पक्ष पद व प्रतिष्ठे सोबत दोन वेळेच्या लाखेच्या



फरकाचा विजय पाहता भाजपाचे कपिल पाटलावर सर्वात जास्त पैज लागत असल्याची चर्चा आहे,तर अनेक कार्यकर्त्यामध्ये उमेदवारा प्रति असलेली निष्टा पाहता ४ जून ची वाट न पहाता आपल्या कामाच्या विश्वासावर अगोदरच शाल पुष्पगुच्छ, हार घालून तोंड गोड करून अगोदरच विजयाच्या सुभेच्छा देत आहेत,तर पैजा लावणारे देखील छाती ठोक पणे कपिल पाटलांना पसंती देत असल्याचे बोलले जातेय.

## आदिवासी वाड्या-पाड्यावर पाणीटंचाईच्या झळा

आधुनिक केसरी न्यूज

**महेश तारमळे**

**ठाणे :** तालुक्यात डिंसेबरपासून २२ व ४३ वाड्या पाड्यावर भिषण पाणी टंचाईच्या झळा पोहचत असता ना देखील गेल्या दोन महिण्या पासून निवडणूकीच्या शिमग्यात पाणी टंचाईकडे कडे कानाडोळा सुरू होता,मात्र कलंबाड (भो)येथे येथील जलजिवन मिशन योजना शासनाच्या भोंगळकारभारा मुळे अपुर्ण अवस्थेत असल्याने येथील वुद्ध महिला लहानमुल गावालगतच्या एका कोरड्या विहिरीत थोंडासा पाण्याचा निचऱ्या तील पाणी रात्र भर जागुन टिपुन भरीत आहेत तर गावालगतची ३४ लोकसंख्या असलेली कातकरी वाडीतील कुटूंब वाडी लगतच्या एका चखलयुक्त डबक्यातील पाणी भरून ते पाणी पिण्यासाठी वापरलं जातेय,गेले तीन महिन या वाडीवर पाण्या अभावी खूपच दयनीय अवस्था झाल्याचे पहावयास मिळत आहे.या वाडीतील महिला,लहान मुलं,वयस्कर माणसं,गरोदर स्त्रिया हे सर्वजण दूरवरून पायपीट करून खड्ड्यातील पाणी पिण्यासाठी आणत आहेत.हे पाणी खड्ड्यातील असल्यामुळे ते निर्जंतुक नसल्याने परिणामी वाडीमधील ग्रामस्थांना वारंवार वेगवेगळे आजाराना तोंड द्याव लागत आहे,या वाडी लगतअसलेल्या दांडवाडी,वाघवाडी मोखवाडी,दुर्गापुर या वाड्यांची परिस्थिती देखील वेगळी नसून किमान पिण्याच्या पाण्यासाठी तरी मायबाप सरकारने पाण्याची व्यावस्था करावी एवढीच ग्रामस्थाची मागणी आहे.



## नाशिकमध्ये १५ लाख नागरिकांची टँकरवर भिस्त

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** तापमानाने ४२ अंशाचा टप्पा गाठला असताना दुसरीकडे मेच्या उत्तरार्धात नाशिक विभागातील पाणी टंचाईची तीव्रता वाढली आहे. सध्या पाच जिल्ह्यातील टंचाईग्रस्त ७१३ गावे आणि २४४८ वाड्या अशा एकूण ३१६१ गाव-वाड्यांना ७७८ टँकरम धून पाणी पुरवठा करावा लागत आहे. गावांसाठी २०८ तर टँकरसाठी २४३ अशा एकूण ४५१ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यास टंचाईची सर्वाधिक झळ बसली असून नंदुरबार जिल्ह्यात कुठेही टँकरची गरज भासलेली नाही. धरणांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिकमध्ये सर्वाधिक टँकर सुरू आहेत. विभागातील सुमारे १५ लाख लोकसंख्येची टँकरवर भिस्त आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या अहवालातून मे महिन्यात विभागातील टंचाईचे संकट अधिक गडद झाल्याचे स्पष्ट झाले आहे. नाशिक जिल्ह्यात सध्या ३२० गावे आणि ८२४ वाड्यांमध्ये ३५२ टँकर सुरू आहेत. जिल्ह्यात लहान-मोठे २४ हून अधिक धरणे आहेत. धरणांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जिल्ह्यातील शेकडो गावे-वाड्या पाणी टंचाईला तोंड देत आहेत. १२ तालुक्यात टँकर सुरू असून दिंडोरी, त्र्यंबकेश्वर आणि निफाड हे तीन तालुके त्यास अपवाद आहेत. या जिल्ह्यात गावांची तहान भागविण्यासाठी ४९ तर, टँकरसाठी १३३ अशा एकूण १८२ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. खान्देशातील जळगावमध्ये ७८ गावांना ९७ टँकरने पाणी पुरविले जात आहे. यात जळगाव, चाळीसगाव, भडगाव, अमळनेर, रावेर या तालुक्यातील गावांचा समावेश आहे. या जिल्ह्यात गावांसाठी ९५ तर टँकरसाठी ५९ विहिरी अधिग्रहीत करण्यात आल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. जळगावमधील दोन लाख ३१ हजार ४२३ नागरिकांची पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर भिस्त आहे. धुळे जिल्ह्यात धुळे व शिंदखेडा तालुक्यातील प्रत्येकी चार गावात एकूण आठ टँकरने पाणी दिले जात आहे. नंदुरबार जिल्ह्यात टँकरची गरज भासलेली नसल्याचे अहवालावरून दिसते.

# तीन वर्षांपासून घरपट्टीचा रुपयाही बँकेत जमा न करता सचिवाने वरचेवर केला खर्च

## कारवाई न झाल्यास ग्रामपंचायत सदस्य करणार अर्धवट पाण्याच्या टाकीवर बैठा सत्याग्रह

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** तालुक्यातील ग्राम नागापुर येथील ग्रामपंचायत सदस्य यांनी जिल्हाधिकारी यांना दि. 21 मे ला निवेदन दिले त्या निवेदनात मौजे नागापूर, ता. मेहकर येथे होत असलेल्या जलजिवन मिशन व इतर ग्रामपंचायतच्या नियमबाह्य व भ्रष्ट कारभाराबाबत चौकशी समिती नेमुन कार्यवाही करणे बाबत मागणी करण्यात आली आहे त्यांनी आपल्या निवेदनात नागापूर ग्रामपंचायत अंतर्गत खालील नियमबाह्य कामाची पंचायत समिती मेहकर व मु.का.अ.जि.प. बुलढाणा यांचेकडे वारंवार तक्रारी दाखल करुन सुध्दा चौकशी न झाल्याने उच्चस्तरीय चौकशी समिती नेमुन खालील मुद्द्यांची चौकशी करावी १. जलजिवन मिशनव्दारे झालेले काम हे अतिशय निकृष्ट दर्जाचे असुन त्यामध्ये लोखंडी कॉकची तरतुद असतांनी त्यांनी प्लॅस्टीकचे कॉक वापरले व त्याला कुठल्याही प्रकारचे साईड गाईडर न वापरल्याने कॉक वारंवार तुटत आहेत.२. गजानन गायकवाड यांचे घरापासुन ते मारोती मंदिर, जुनी मस्जीद, स्मशानभुमी या भागाकडे करण्यात आलेली पाईपलाईन ही फक्त १ फुटावरच करण्यात आली यामुळे ती अंतर्गत पाईपलाईन वारंवार फुटत आहे.३. नदीपात्रात पाईपलाईनचा पाईप हा खुला ठेवण्यात आला त्यावर कुठल्याही प्रकारचेआर. सी.सी. बांधकाम करण्यात आलेले नाही.४. वितरण व्यवस्थेची पाण्याच्या टाकीचे बांधकाम मागील ४ महीन्यापासुन रखडलेले आहे. ५ आजपर्यंतही ४० टक्के नागरीकांना सदर योतनेतुन पाणी घरापर्यंत पोहचू शकले नाही. ६ अंदापत्रकामध्ये नविन दोन मोटरपंपाची तरतुद असतांनी सुध्दा कुठल्याही प्रकारचे नविन मोटरपंप त्यामध्ये टाकन्यात आलेले नाही. जुनेच मोटरपंप दुरुस्त करुन विहीरीमध्ये टाकण्यातआले. गावातील नागरीकांना पाण्यासाठी वन-वन फिरावे लागत आहे. दि. १९/५/२०२४ रोजी




गावातील एक महीला विहीरीमध्ये पडली व तीला गंभीर इजा झाली. यामुळे पुढेही एखादीमोठी दुर्घटना होऊ शकते ८. संबधीत ग्रा.पा.पु. अभियंत्याने या कामावर अनेक तक्रारी दाखल असतांनी सुध्दा कुठल्याही प्रकाची शहानिशा न करता आर्थिक देवाण-घेवाण करुन संबधीत ठेकेदाराचेदर महीन्याला मासिक सभा घेणे ही अधिनीयमात

**शासकीय सुट्टीच्या दिवशी ग्रामपंचायत कार्यालय उघडे कसे :** बौद्ध पौर्णिमेनिमित्त सर्व शासकीय कार्यालयांना सुट्टी असल्यामुळे सर्वच कार्यालय बंद होते परंतु मेहकर तालुक्यातील ग्राम नागापूर येथील ग्रामपंचायत ही उघडी होती ग्रामपंचायत उघडी असताना त्यामध्ये कर्मचारी काहीतरी शासकीय कामे करत असताना आढळून आला . सुट्टीच्या दिवशी शासकीय कार्यालयामध्ये काम करत असताना काही शासकीय रेकॉर्डमध्ये खोड तोड तर करत नाही ना ? किंवा काही शासकीय फायली तर कहा करत नाही ना ? अशी चर्चा जनतेमध्ये सुरू आहे .

तरदुत असतांनी मागील ४ महीन्यापासुन कुठल्याही प्रकारची सभा घेण्यात आलेली नाही. याबाबत सुध्दा अनेकदा पं. स. मेहकर येथे तक्रार दाखल केलेली आहे याची सुध्दा चौकशी संबधीत विस्तार अधिकारी यांनी केलेली नाही. संबधीत विस्तार अधिकारी यांचेवर सुध्दा कार्यवाही करण्यात यावी. ९. मागील ३ वर्षापासुन घरपट्टीचा १ रुपयाही सामान्य निधीच्या खात्यामध्ये टाकण्यात आलेला नाही. तो संपुर्णपणे सचिव यांनी वरचेवर खर्च केला व त्याचा कुठल्याही प्रकारचा हीशोब सदस्यांना दिलेला नाही. १०. १५ वित्त आयोगामध्ये लाखो रुपयाचा निधी पडुन आहे, परंतु त्यानी कुठल्याही प्रकारचा निधी खर्च केलेला नाही. ११. मागील २ महीन्ययामध्ये सचिव ग्रामपंचायतमध्ये आलेले नाहीत यांची सुध्दा चौकशी होणे गरजेचे आहे. वरील सर्व ११ मुद्यांची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी समिती नेमुन कार्यवाही करण्यात यावी असे न झाल्यास दि. ३/६/२०२४ रोजी अर्धवट बांधकाम झालेल्या पाण्याच्या टाकीवर गावकऱ्यांच्या वतीने बैठा सत्याग्रह करण्यात येईल व याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील असे निवेदनात नमूद केले असून सदर निवेदनावर . ग्रामपंचायत सदस्य .धन्यकुमार गंगाराम खिल्लारी रुबीना परविन सै. याकुब (सदस्य) देवानंद मोतीराम खोडके आसियाबी सै. शरीफ व इतर गावकरी यांच्या सह्या आहेत.




## कळंब शहरात भगवान बुद्ध जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** महाकारूणिक भगवान तथागत गौतम बुद्ध यांच्या २५६८ व्या जयंतीनिमित्त दि.२३ मे रोजी शहरातील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर येथे स्मारक समितीच्या वतीने तथागत गौतम बुद्ध मूर्ती व विश्वरत्न डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण प्रबुद्ध रंगभूमी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सुभाष घोडके यांच्या हस्ते करून सामुदायिकरित्या त्रिशरण पंचशील घेण्यात आले. यावेळी बौद्ध महासभेचे सी.आर. घाडगे, राजाराम वाघमारे, मारुती गायकवाड, भास्कर सोनवणे, निवृत्ती हौसलमल, उत्तम कांबळे, स्मारक समितीचे विश्वस्त माजी नगरसेवक डॉ.सुनील गायकवाड, शिवाजी सिरसट, राजाभाऊ गायकवाड, प्रमोद ताटे, शंकर वाघमारे, रमेश बोर्डेकर, रसूल खान,भाऊसाहेब कुचेकर, किशोर वाघमारे, उत्तम सावंत, माणिक गायकवाड, सचिन तिरकर, महावीर गायकवाड, मधुकर शिलवंत, शहाजी सिरसट, सुनिल तवले, प्रा.अविनाश घोडके, प्रशांत धावारे आदींची उपस्थिती होती.

## दुचाकीची स्कुटीला धडक पती-पत्नी जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** भरधाव दुचाकीने स्कुटीला धडक दिल्याने पती-पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना चिखली मार्गावर जवळखेड फाट्या नजिक घडली.
याबाबत पोलिस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार फिर्यादी त्यांचे पत्नी सह त्यांचे मालकीची स्कुटी क्रं एम एच -२८-ए एक्स ५९७२ घेवुन देउळगाव राजा येथे येत असतांना समोरुन येणा-या सीबी शाइन कंपनिची क्रं एम एच २८-बी ई ९७६७ मोटार सायकलचे चालकाने त्याची दुचाकी भरधाववेगाने व निष्काळजी पणाने चालवुन फिर्यादी चे स्कुटीला समारुन ठोस मारुन फिर्यादी ला व त्याचे पत्नीस जखमी करुन पत्नीच्या उजवे पायाला फॅक्चर करणेस कारणीभुत झाला.फिर्यादी यांच्या तोंडी रिपोर्ट व मेडीकल रिपोर्ट वरुन पोलिसांनी दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

## विवाहितेचा पाठलाग करून पतीचे डोके फोडले

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** विवाहित महिलेचा वाईट उद्देशाने पाठलाग करून त्रास दिल्या प्रकरणी पोलिसांनी एका विरुद्ध गुन्हा नोंदविला.सदर घटना सिव्हिल कॉलनी येथे घडली. याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार विवाहित महिलेचा वाईट उद्देशाने पाठलाग करून त्रास देणाऱ्यास महिलेच्या पतीने विचारणा केली असता अश्लील शिवीगाळ करून चापटा बुक्क्यांनी मारहाण केली. फिर्यादीची पत्नी ही सोडविण्यासाठी गेली असता तिलाही चापट मारून लोटून दिले व त्या ठिकाणी पडलेला लोखंडी रॉड उचलून महिलेच्या पतीस डोक्यात मारून जखमी केले.सदर घटना सिविल कॉलनी येथे परम कलासेस जवळ घडली. पवन देविदास झिने वय २३ यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी चेतन मनोज भालेराव राहणार सिव्हिल कॉलनी याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. ठाणेदार संतोष महल्ले यांच्या मार्गदर्शनात पोलीस हेडकॉन्स्टेबल भास्कर सानप अधिक तपास करीत आहे.

## बालादेवी देवस्थान जमीन शासनाने ताब्यात घेऊन प्रशासक नेमावा

### सामजिक कार्यकर्ते हणमंत पाटील जगदंबे

आधुनिक केसरी न्यूज



**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** शहरातील मौजे बाळापूर स्थित असलेले श्री बालादेवी देवस्थान ची असलेली जमीन आता त्या ठिकाणी कोणीही वारस नसल्यामुळे शासनाने ही जमीन ताब्यात घेऊन देखभाल करण्यासाठीं प्रशासक नियुक्त करण्यात यावे अशी मागणी जेष्ठ राजकिय विश्लेषक तथा सामाजिक कार्यकर्ते हणमंत पाटील जगदंबे यांनी धर्माबाद तहसिलदार यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे. श्री बालादेवी देवस्थाने जमिनीचे देखभाल अर्चक म्हणून अनापूर्णाबाई विठलराव येळवतकर हे करीत होते पण त्यांचे निधन झाल्यापासून सदरच्या विरासत मध्ये वारस म्हणूण कायदेशीर रित्या कोणीही पुढे आले नसल्याने प्रशासनाने ही जमीन ताब्यात घ्यावी आणि जमिनीची देखभाल व मंदिराची देखभाल करण्यासाठी प्रशासक नियुक्त करावे असेही हणमंत पाटील जगदंबे यांनी निवेदनात नमूद केले आहे. बाळापूर स्थित असलेले श्री बालादेवी देवस्थान यांच्या कडे सर्वे गट क्रमांक 586/1मध्ये 26 गुंटे, गट क्रमांक 564/1मध्ये 1हेक्टर 65 आर, गट क्रमांक 564/2मध्ये 17 गुंटे असे क्षेत्र असून उपरोक्त जमीन शासनाने ताब्यात घ्यावी आणि जमिनी ची देखभाल व मंदिर संस्थान ची देखभाल करण्यासाठी प्रशासक नियुक्त करण्यात यावे असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## आ. पी. एन. पाटील यांच्या अंत्यदर्शनासाठी गर्दी; शासकीय इतमामात अंत्यविधी होणार

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष, करवीरचे आमदार पी. एन. पाटील यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी गुरुवारी कोल्हापूर जिल्हा काँग्रेस भवनात एकच गर्दी झाली. अश्रूभरल्या नेत्रांनी कार्यकर्ते, नागरिकांनी अंत्यदर्शन घेतले . कोल्हापूर जिल्ह्यातील काँग्रेसचे खंबीर नेतृत्व हरपले अशा भावना श्रीमंत शाहू महाराज यांनी व्यक्त केल्या. तर तत्त्वनिष्ठ, ध्येयनिष्ठ नेतृत्व हरपले, अशा शब्दांत पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी भावना व्यक्त केल्या. शासकीय इतमामात अंत्यविधी होणार असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. आमदार पी. एन. पाटील हे चार दिवसांपूर्वी घरातील स्नानगृहात पाय घसरून पडले होते. त्यानंतर त्यांना कोल्हापुरातील अस्टर आधार या रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले. तेथे त्यांच्यावर मेंदू विकाराची शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र त्यांची प्रकृती गंभीर होती. उपचारासाठी मुंबईहून नामवंत मेंदू विकार तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले होते. त्यांच्या निगराणी खाली उपचार सुरू होते. प्रकृतीत काही प्रमाणात सुधारणा झाली असली तरी ती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले होते.गेले चार दिवस या रुग्णालयात कार्यकर्त्यांची वर्दळ वाढली होती. तर गावागावांमध्ये पी. एन. पाटील यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी, यासाठी देव देवतांना साकडे घालण्यात आले होते. दरम्यान आज पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. पी. एन. पाटील यांच्या निधनाचे वृत्त समजताच रुग्णालयात नागरिकांनी गर्दी केली. त्यानंतर राजारामपुरी येथील निवासस्थानी त्यांचे पार्थिव नेण्यात आले. यानंतर कोल्हापूर जिल्हा काँग्रेस भवनात त्यांचे पार्थिव आणण्यात आले. येथे अंत्यदर्शन घेण्यातील विविध स्तरातील नागरिकांनी गर्दी केली होते. कार्यकर्त्यांना भावना अनावर झाल्या. अनेकांच्या डोळ्यांमध्ये अश्रू तरळले. आमदार पी. एन. पाटील अमर रहे अशा घोषणा दिल्या जात होत्या. काँग्रेस पक्षाचा तिरंगा ध्वज लपेटलेले त्यांचे पार्थिव सुमारे तासभर येथे ठेवण्यात आले होते. यावेळी श्रीमंत शाहू महाराज, युवराज मालोजी राजे , आमदार ऋतुराज पाटील, आमदार जयश्री जाधव, माजी मंत्री जयवंतराव आवळे , राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष व्.ही बी. पाटील, शहराध्यक्ष आर . के. पोवार, दत्त कारखान्याचे अध्यक्ष गणपतराव पाटील यांच्यासह अनेकांनी अंत्यदर्शन घेतले.

# पुणे अपघात प्रकरणात सुप्रियाताई सुळे गप्प का ?

## आमदार नितेश राणे यांचा पत्रकार परिषदेत सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**सिंधुदुर्ग :** पुणे अपघात प्रकरणात सुप्रियाताई सुळे गप्प का? शरद पवार गटाकडून या प्रकरणात कोणती प्रतिक्रिया का येत नाहीये? अगरवाल आणि पवार कुटुंब यांचे काय संबंध आहेत काय? आरोपीला दिलेला वकील पवार कुटुंबियांच्या घनिष्ट संबंधांतील असल्याची माहिती मिळेते आहे. म्हणजे अग्रवाल याला वाचवण्याचा प्रयत्न होतो आहे का? त्यामुळे एरव्ही सर्वप्रकरणी आवाज उठविणाऱ्या आणि राजीनामे मागत फिरणाऱ्या सुप्रिया सुळे यांनी याबाबत व्यक्त व्हावे, असं म्हणत नितेश राणे यांनी खासदार सुप्रिया सुळेंना सुनावलं आहे. आमदार नितेश राणे यांनी कणकवलीत ओम गणेश निवासस्थानी पत्रकारांशी बोलताना शरद पवार



गटाच्या सुप्रिया सुळे यांचा चांगलाच समाचार घेतला. तर आशिष शेलार यांची तक्रार योग्य आहे. ४ जूनला एनडीएचा मोठा विजय होणार हे स्पष्ट आहे. शेमड्या मुलासारखे उद्धव ठाकरे वागत आहेत. तुमचा पराभव



स्वीकारा, असे खडेबोल आमदार नितेश राणे यांनी ठाकरेंना सुनावले आहेत.

निवडणूक आयोगामुळे मतदान कमी झाल्याची टीका जितेंद्र आव्हाड करत आहेत. हेही हास्यास्पद आहे. मुंब्र्यात बोगस मतदान होते, याकडे आव्हाड यांनी पहावे. रोहिंग्या आणि बांगलादेशी लोक किती प्रमाणात मतदान करतात आणि हे बोगस मतदान कोण करून घेतं, त्यावर आव्हाड यांनी बोलावं. राजकीय जाणकार जे भाजपाच्या २५० किंवा ३०० यश संभाव्य आकडेवारीवर भाष्य करताहेत त्यांना ४ जुनलाच मतपेटीतून उत्तर मिळेल. अशीच आकडेवारी २०१४ आणि २०१९ मध्ये सुद्धा सांगितली जात होती. मात्र जनता ही नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी आहे आणि कायम राहील हे मतपेटीतून दिसून येईल. मनोज जरांगे पाटील यांच्या ६ जून रोजीच्या दिलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्यावर बोलताना आमदार नितेश राणे म्हणाले की काहीही झाले तरी मराठा आरक्षण महायुती सरकार देणारच आहे. कोणत्याही आरक्षणात धक्का न लावता मराठा आरक्षण दिले जाणार आहे. लोकशाहीत आंदोलनाचा हक्क प्रत्येकाला आहे. त्यांनी ते करावे.

भाजपाच्या बड्या नेत्याने विनायक राऊत यांना निवडणुकीत ५० कोटी दिल्याचा गौप्यस्फोट शिवसेना नेते भास्कर जाधव यांनी केला. त्याला प्रत्युत्तर देताना नितेश राणे म्हणाले की विनायक राऊत यांचा पराभव समोर असल्यानेच भास्कर जाधव असे आरोप करत आहेत. विनायक राऊत यांच्या प्रचाराला संजय राऊत का आले नाहीत? उबाठामध्ये एकमेकांचे पाय ओढले जातात, भाजपात नाही. काँग्रेस नेते, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते किंवा स्वतः शरद पवार प्रचाराला का आले नाहीत. त्यामुळे विजय हा भाजपचाच होणार राणे साहेब विजयी होणार गुलाल आम्हीच उधळणार अशा शब्दात आमदार नितेश राणे यांनी भास्कर जाधव यांना सुनावले.

## लेहा जहागीरच्या सरपंच व उपसरपंचाविरोधात अविश्वास ठराव

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील ले हा जहागीर येथील सरपंच सौ अनिता सुधाकर पवार व उपसरपंच श्री ज्ञानेश्वर निकम यांच्या विरोधात आन्ना मैंद, मानसिंग बैनाडे,रुपाली चव्हाण,शांता रसाळ, सुनिता मोरे, सोफियाबी शेख चाँद,मंदाबाई म्हस्के या ग्रामपंचायत सदस्यांनी सरपंच/ उपसरपंच आम्हाला विश्वासात घेत नाही,मनमानी कारभार करतात, कामात अनियमितता करतात असे कारणे देऊन मा.तहसीलदार फुलंब्री यांच्या कडे अविश्वास ठराव मांडला असता दिनांक 22 रोजी विशेष सभा बोलावून पुढील कार्यवाही करण्यात आली. सदरील अविश्वास ठराव हा सात विरुद्ध दोन अशा फरकाने संमत करण्यात आला. यावेळी निर्वाचन अधिकारी म्हणून तहसीलदार श्री कृष्णा कानगुले यांनी कामकाज पाहीले तर एस.एस.शेख, ग्रामसेवक व्हि. टी. गायकवाड, तलाठी जी. बी. बहुरे यांनी कामकाज पार पाडले.

## कोल्हापूरात अनधिकृत होर्डिंगधारकांना दणका

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** अनधिकृत होर्डिंग उभारणाऱ्यांना कोल्हापूर महापालिकेने बुधवारी दणका दिला आहे. शहरातील तिघा अनधिकृत होर्डिंगधारकांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मुंबई येथे भले मोठे होर्डिंग कोसळून अनेकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर राज्यात सर्वत्र तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले होते. कोल्हापूर महापालिकेने होर्डिंग धारकांची बैठक घेऊन अनधिकृत फलक काढण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानंतर कोल्हापूर महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने ही मोहीम जारी करत अनेक ठिकाणचे फलक काढण्यात आले. आज साने गुरुजी मेन रोड येथे संतोष जाधव, भक्ती पूजा नगरातील राजेंद्र ओसवाल आणि खराडे कॉलेज जवळील नवरत्न केंद्र या तीन अनधिकृत होर्डिंग धारकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## धम्मभूमी महाविहार येथे उत्तम दर्जाचे धम्म विपश्यना केंद्र तयार करण्याचा संकल्प : आ. किशोर जोरगेवार

### बुध्द पोर्णिमानिमित्त बाबुपेठ येथील धम्मभूमी महाविहार येथे कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** समाजात अभूतपूर्व बदल घडवून आणण्यात भगवान गौतम बुध्द यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. गौतम बुद्धांनी दिलेल्या शिकवणीतुन अनेकांच्या मनात समाजासाठी प्रेमाची भावना निर्माण झाली आहे. त्यांच्या हिंसा, करुणा, शांती या विचारांमुळे समाजाला आदर्श मार्ग मिळाला. चंद्रपूरात धम्म विपश्यना केंद्र तयार करण्याची इच्छा होती. ती इच्छा पूर्णत्वास येणार असून धम्मभूमी महाविहार च्या 8 एकर जागेवर धम्म विपश्यना केंद्र तयार करण्याचा संकल्प आपण केला असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

बुध्द पोर्णिमा निमित्त बाबूपेठ येथील धम्मभुमी महाविहार येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी श्रद्धेय भंतन सुमनवन्नो महाथेरो, सचिव महाराष्ट्र भिक्कु संघ, अक्षय गोवर्धन, संतोष रामटेके, अनिकेत रामटेके, श्रध्दा आंबेकर, विनोद रामटेके, बुध्दांन उराडे, रितेश निमगडे, प्रतीक ढवळे, शिला उमरे, शारदा कांमळे आदिंची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे मी आमदार होऊ शकलो. शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा त्यांनी दिलेला मंत्र आपण अंगीकारला पाहिजे. मात्र आजच्या व्यवस्थेत उत्तम दर्जाचे शिक्षण घेणे परवडणारे नाही. त्यामूळे आपण मतदार संघात 11 अभ्यासिका तयार करण्याच संकल्प केला होता. यातील 8 अभ्यासिकेंचे कामे जवळपास पूर्ण झाली आहे. तर काही कामे प्रगतीपथावर आहे. यातील एक अभ्यासिका आपण पवित्र दिक्षाभुमी येथे तयार करत आहोत. त्या अभ्यासिकेची नुकतीच आपण पहाणी केली. याचे 90 टक्के काम पूर्ण झाले आहे. एक लाख पूस्तके या अभ्यासिकेत असणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.

धम्मभुमी महाविहार बुध्द विहार येथे आल्यावर नवी चेतना मिळाली आहे. हे शांतीचे केंद्र आहे. आपण उत्तम व्यवस्था येथे केली आहे. सुंदर असा परिसर आपण विकसीत करत पावन स्थळ तयार केले आहे. येथून तथागत गौतम बुद्ध यांच्या समाजोपयोगी विचारांचा येथून प्रचार प्रसार होत आहे. या शांती केंद्राचा विकास झाला पाहिजे तुमची आणी माझी ही इच्छा असून नक्कीच हे विहार चंद्रपूरातील उत्तम दर्जाचे धम्म विपश्यना केंद्र बनेल असा विश्वास यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी तथागत गैतम बुध्द आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना माल्यार्पण करुन वंदन केले. यावेळी स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## शांताराई कनिष्ठ महाविद्यालयाची बारावीमध्ये शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**खुलताबाद :** तालुक्यातील ताजनापूर येथील शांताराई कनिष्ठ महाविद्यालयाचे इयत्ता बारावी मध्ये.100% निकालाची परंपरा कायम राखत घवघवीत यश..मिळवत बायोलॉजी व गणित या विषया मध्ये100/98 . एच.एस.सी. बोर्डाच्या गुणवंतविद्यार्थी यादीमध्ये नाव समाविष्ट केले. प्रथम क्रमांक वैष्णवी गणेश निळ. 88.66 द्वितीय क्रमांक तनुजा जावळे 83.14 तृतीय क्र.अनुष्का अन्नपुरे 82.33 यामध्ये विशेषतः सर्व मुलींनी बाजी मिळवली असून संस्थेच्या वतीने संस्थापक गणेश काळे पुणे येथील नामांकित महाविद्यालयातील अनुभवी चीप ॲडमिनिस्टीट्यू प्राध्यापक डॉ. विकास वाकचौरे प्राध्यापिका प्रियारणदिवे, प्राध्यापक सुजल चव्हाण प्रा. प्रा.अतुल गुळवे, प्रा.अमोल दांडेकर ,लिपीक सतिष जाधव, किरण काळे सर, कल्पना काळे मावशी इत्यादींनी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला.परिसरामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा चा वर्षाव होत आहे.





# पाणी भविष्यातील सर्वात मोठी संपत्ती : डॉ. लिना देशपांडे

आधुनिक केसरी न्यूज

**लक्ष्मण मडके**

**शेवगाव :** भारत फोर्ज कंपनीने समाजाप्रती असलेल्या दायित्वाची जाण म्हणून शिक्षण, आरोग्य, जलसंधारण, वृक्षारोपन आदी विविध क्षेत्रामध्ये मोठे काम उभे केले आहे. दुष्काळावर व वाढत्या तापमानावर मात करण्यासाठी जलसंधारण व वृक्षारोपन ही भविष्यातील सर्वात मोठी गरज असून त्यादृष्टीने कंपनी गावोगावी अर्थ व तंत्रसहाय्य देवून जलसंचयाला व पर्यावरण संतुलनाला मदत करत आहे. नागरिकांनी आपले योगदान देवून कंपनीच्या या कामाला लोकचळवळीचे स्वरुप द्यावे, असे प्रतिपादन भारत फोर्ज कंपनीच्या सामाजिक दायीत्व विभागाच्या प्रमुख डॉ. लिना देशपांडे यांनी केले. सामनगाव ता. शेवगाव येथील ढोरा नदीवरील बंधाऱ्याच्या खोलीकरणाचे काम भारत फोर्ज लि. पुणे यांच्या मार्फत करण्यात येत आहे. या कामाच्या पाहणीनंतर ग्रामस्थांशी साधलेल्या संवादात देशपांडे बोलत होत्या. यावेळी कंपनीच्या सामाजिक दायीत्व विभागाचे समन्वयक जयदीप लाड, जलदूत उमेश भालसिंग, ज्येष्ठ नेते अॅड. वसंतराव कापरे, माजी सभापती संदिप सातपुते, शिवाजी भिसे, हरिश्चंद्र वांढेकर, सरपंच आदीनाथ कापरे, उपसरपंच संगिता नजन आदी प्रमुख उपस्थित होते. यावेळी देशपांडे म्हणाल्या की, पाणी ही भविष्यातील सर्वात मोठी संपत्ती आहे. त्या दृष्टीने जलसंचय करणारी गावे यापुढे सर्वात श्रीमंत व संपन्न म्हणून गणली जाणार आहे. नदीला आई समजून तिचे संवर्धन व जतन करणे काळाची गरज आहे. जलसंधारणाच्या कामाला लोकचळवळीचे स्वरुप आल्यास आपले भविष्य अधिक सुरक्षित होण्यास मदत होणार आहे.

यावेळी वसंत कापरे व उमेश भालसिंग, बाळासाहेब गव्हाळ आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी रमेश कापरे, दीपक भुसारी, सचिन सातपुते, शिवाजी कापरे, आदिनाथ नजन, अनंता वांढेकर,अरुण काळे, प्रमोद कांबळे, किरण कापरे, श्रीकांत मिसाळ, समीर सातपुते, साईनाथ सातपुते, ग्रामसेवक देविदास पंडीत, भगवान कापरे, दत्तात्रय खरड, रवींद्र सातपुते, कृष्णा सातपुते, जनार्दन वांढेकर, बाबासाहेब जाधव, देवदान कांबळे, लक्ष्मण जाधव, बाजीराव कोकाटे, दत्ता जाधव , नानासाहेब बनसोडे, अशोक उदागे, संजय बडे आदींसह सामनगाव व मळेगाव येथील ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक संदिप झाडे यांनी तर सूत्रसंचालन राजू घुगरे यांनी केले. तर सरपंच आदिनाथ कापरे यांनी आभार मानले.

## दुर्मिळ नाणी, गडकिल्ल्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवकाळाचा वेध घेण्यासाठी झपाटलेले संग्राहक श्री रंजन गावडे यांनी शिवराजाभिषेकाच्या ३५० व्या सोहळ्यानिमित्त मुंबई दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात दिनांक २५ आणि २६ मे २०२४ रोजी सकाळी ११.०० ते रात्री ९.०० या कालावधीत शिवकालीन दुर्मिळ नाणी (शिवराई), भारतीय आणि परदेशी नोटा व नाणी आणि वस्तू तसेच त्यांनी काढलेल्या गडकिल्ल्यांच्या छायाचित्रांचे गाथा शिवशौर्याची हे प्रदर्शन आयोजित केले आहे. शिवरायांची प्रतिमा असलेल्या दोन रुपयांच्या २२,२२२ नाण्यांनी साकारलेली शिवप्रतिमा हे या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण असणार आहे. मुंबई, कोलकाता, नोयडा आणि हैद्राबाद मिंट येथील नोटांचा यात समावेश आहे.

या प्रदर्शनाचा हेतू व्यक्त प्रतिपादन करताना रंजन गावडे म्हणाले की, एक इतिहासप्रेमी या नात्याने शिवरायांच्या प्रेरणादायी इतिहासाचा समाजामध्ये प्रचार व प्रसार करणे हे मी माझे आद्य कर्तव्य समजतो. श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती, दुर्गराज रायगड यांच्या विशेष सहकार्याने होत असलेल्या या प्रदर्शनाच्या निमित्ताने इतिहासप्रेमींना पुन्हा एकदा शिवरायांच्या विषयी अभिमान बाळगण्याची तसेच शिवराय अनुभवण्याची अमूल्य संधी मिळणार आहे. त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नाशिकचा पारा पुन्हा ४२ अंशावर

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** थंड हवेसाठी ओळखले जाणारे नाशिक उन्हाळ्यात दिवसेंदिवस तप्त होऊ लागले असून बुधवारी ४२ अंशावर पारा गेला. पाच वर्षातील ही उच्चांकी पातळी आहे. उष्णतेच्या लाटेने नाशिककर अक्षरशः भाजून निघत आहेत. दिवसा उन्हाचे चटके आणि प्रचंड उकाड्याला तोंड द्यावे लागत आहे. रात्रीही वेगळी स्थिती नसते. वाढत्या तापमानाचा जनजीवनावर विपरित परिणाम झाला आहे. उष्णतेची लाट काही दिवस कायम राहण्याची शक्यता असल्याने आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांकडून केले जात आहे.

मार्चपासून उंचावणाऱ्या तापमानाने मेच्या उत्तरार्धात ही पातळी गाठली. एप्रिल महिन्यात तापमानाने ४० अंशाचा टप्पा गाठला होता. काही दिवसांपूर्वी वळीवचा पाऊस झाल्यानंतर तापमान काहिसे कमी झाल्याचे जाणवत होते. आकाश निरभ्र झाले आणि पारा पुन्हा उंचावू लागला.

# तळ्यातील सुपीक गाळ, बहरतोय पडीक माळ

## शेतकऱ्यांच्या भावना माळरान पवनचक्कीसाठी नाही, तर गाळासाठीच योग्य

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** 2023 या साली अल निनोचा भारतातील मान्सूनच्या पावसावर थेट परिणाम होणार असल्याचे NOAAने म्हटले होते. याच अलनिनो च्या प्रभावामुळे मागील वर्षी मराठवाड्यासह धाराशिव जिल्ह्यामध्ये पर्जन्यमान अत्यंत कमी झाले. मराठवाड्यातील प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. मागील वर्षी पाऊसमान कमी झाल्याने यावर्षी बाजारातील आर्थिक गणित चांगलेच कोलमडले होते.

वाहन उद्योग व्यवसायावर मंदीचे सावट होते. कारण ऊस हंगाम लवकर आटोपल्यानंतर अनेक ट्रॅक्टर वाहने उभा होती. ट्रॅक्टरचे हप्ते भरणे जिकरीचे होते. आणि इकडे आचारसंहितामुळे अनेक कामे ठप्प असल्याने टिप्पर धारक हे हवालदिल होते. अशातच शासनाच्या 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' या महत्वकांक्षी योजनेने सर्वांच्या चेहऱ्यावर उद्या दुष्काळच्या परिस्थितीमध्ये सुद्धा हसू फुलविले आहे.

'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' या योजनेचे महत्त्व पाहता या वेळेस शासनाकडून यंत्रसामग्री आणि इंधन दोन्हींचा खर्च देणे प्रस्तावित करण्यात आला असून, अल्प व अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांनासुद्धा या योजनेचा लाभ घेता यावा याकरिता शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येणार आहे. त्यामुळे बळीराजा ही आनंदी राहणार आहे. याच योजनेमुळे उभा असलेले ट्रॅक्टर, टिप्पर,जेसीबी,पोकलेन या विविध यंत्रसामग्री वरील ड्रायव्हर, वाहनधारक मालक, गॅरेज वाला, टायर पंचर वाला अशा अनेक एकमेकांवर आधारित असणाऱ्या लोकांच्या हातात चार पैसे





मिळत आहेत. शासनाच्या या स्तुस्त उपक्रमामुळे गेल्या पिढ्यान पिढ्या पडीक माळरान जमीन आज या तळ्यातील गाळामुळे काळीभोर बागायती दिसू लागली आहे. जिल्ह्यातील अशाच माळरान जमिनीवर पवनचक्की एजंट डोळा ठेवून असताना. शेतकऱ्यांच्या जमिनी तीस वर्षे भाडेतत्त्वाच्या नावे खाली अत्यंल्प भावात खरिदी करून जमीन मालकालाच त्याच विंडो च्या देखरेखी साठी राखणदार म्हणून थोड्या पगारीवर ठेवले जात आहे. पुण्यातील मुळशी पॅटर्न प्रमाणे इकडे दुष्काळी परिस्थितीमुळे धाराशिव पॅटर्न हा पवनचक्क्या उभारणीसाठी बनत चालला असताना, जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आम्हाला तुमचा करार नको, आमची गाडी तुमच्याकडे भाड्याने नको, मीच माझ्या जमिनीवर मालकाच्या ऐवजी नोकर नको असे ठणकावून सांगत या एजंट गिरीच्या भूलथापाला बळी न पडता धाराशिव जिल्ह्यातील बळीराजा उसनवारी, घरातील सोनं नाणं घाण ठेवून किंवा वाहनधारकांसोबत आजचं उद्याचा वायदा करून या खडकाळ, दगडाळ, मुरमाड पडीक आईला काळ्याभोर सुपीक गाळाचा शालू पांघरून घालत ही मराठवाड्यासाठी खूप अभिमानाची बाब आहे. या शासनाच्या स्तुत्य उपक्रमामुळे आज बाजारात चार पैसे फिरत आहेत.

वाहनधारक-इंधनधारक इतर आधारभूत व्यावसायिक या सर्वांच्या व्यवसायाला आर्थिक गती मिळाली आहे. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' या योजनेतून शेतकऱ्यांना यंत्रसामग्री आणि इंधन याचा खर्च शासन देत असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी याचा लाभ घेऊन जमीन विकून स्वतःचे मूल्य कमी करण्यापेक्षा जमीन कसदार, बागायती करून जमिनीचे मूल्य वाढवावे असे वयस्कर व जाणकार शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे. कारण याच जुन्या जाणकार बळीराजाच्या मते आजच्या घडीला जमीन विकणे सोप आहे. पण घेणे खूप अवघड आहे. म्हणून ते धरणी आई कुणाला न विकता त्या माळरान जमिनीला काळे सोनं घालून पिकवा पणं विकू नका त्या धरणी मातेला पुढच्या पिढीसाठी जमीन शिल्लक ठेवा असेही काहीसं वयस्कर लोकांमधून बोललं जात आहे.

## श्वानाचे डोके अडकले प्लास्टिक बरणीत; सुखरूप सुटका

आधुनिक केसरी न्यूज

**डोंबिवली :** उन्हाचा कडाका वाढला आहे. भटके प्राणीही पाण्यासाठी वणवण करत आहेत. अशा परिस्थितीत बुधवारी सकाळी डोंबिवली एमआयडीसीत एक भटका श्वान पाण्यासाठी वणवण फिरत असताना त्याला प्लास्टिकची पांढऱ्या रंगाची बरणी दिसली. बरणीत पाणी आहे, असे समजून श्वानाने त्या बरणीत तोंड घातले. पण ते बरणीत अडकले. बरणीत पाणी नव्हतेच, पण तोंड अडकल्याने श्वान अडकलेली मान सोडविण्यासाठी परिसरात अस्वस्थ होऊन उड्या मारू लागला. अरूंद तोंड असलेल्या बरणीत श्वानाचे डोके अडकल्याने ते स्वतःहून त्याला बाहेर काढणे अशक्य झाले. श्वान बरणी अडकलेले डोके जमिनीवर बरणीसह आपटून स्वतःची सुटका करून घेण्याचा प्रयत्न करत होता. त्याला ते जमत नव्हते. काही रहिवासी या श्वानाला पकडून त्याच्या मानेत अडकलेली बरणी काढण्याचा प्रयत्न करत होते. श्वान त्यांना भीतीने दाद देत नव्हता. एमआयडीसीतील एक सामाजिक कार्यकर्ते नंदू ठोसर यांच्या हा प्रकार निदर्शनास आला. संचालक भणगे यांनी तातडीने आपल्या प्राणी बचाव पथकाला आवश्यक साधनांसह रुग्णवाहिकेसह एमआयडीसीत जाण्यास सांगितले.'पॉज'चे पथक एमआयडीसीत दाखल झाले. पथकातील महेश साळुंखे यांनी श्वानाला सहजगत्या पकडण्याचा प्रयत्न केला, पण ते त्यांनाही दाद देत नव्हते. बरणीत तोंड अडकल्याने श्वानाला श्वास घेण्यास त्रास होत होता. त्यामुळे ते सर्वाधिक अस्वस्थ होते.

# बार्टी लाखो मुलांची स्वप्न पूर्ण करणारी नामांकित संस्था : वृषाली कांबळे

## बार्टीमुळेच मी युपीएससी उत्तीर्ण होऊ शकले : बार्टीबद्दल विशेष कौतुक व्यक्त

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** माझे आदर्श विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे असून मी सामान्य कुटुंबातील असल्यामुळे मुंबई शहरामध्ये युपीएससी स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण घेणे कठीण होते.परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या शिष्यवृत्तीमुळेच मी दिल्लीमध्ये नामांकित कोचिंग क्लासचे प्रशिक्षण घेऊ शकले. माझ्या यशात बार्टीचा सिंहाचा वाटा असून बार्टीमुळेच मी युपीएससी परीक्षा पास झाले.बार्टी लाखो मुलांची स्वप्न पूर्ण करणारी नामांकित संस्था आहे.असे प्रतिपादन बार्टी यूपीएससी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी वृषाली कांबळे यांनी बोलताना व्यक्त केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे दिनांक २२ मे २०२४ रोजी बार्टी अंतर्गत निवासी यूपीएससी प्रशिक्षण केंद्र येरवडा,पुणे येथील विद्यार्थ्यांसाठी वृषाली कांबळे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी वृषाली कांबळे यांनी बार्टीचे विशेष कौतुक केले.वृषाली कांबळे पुढे म्हणाल्या की,बार्टी संस्थेचे तत्कालीन महासंचालक धम्मज्योती गजभिये, विद्यमान बार्टी संस्थेचे महासंचालक सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आम्हाला नागरी सेवेत जाण्याची संधी मिळाली असून बार्टीसाठी, समाजासाठी जे जे शक्य आहे ते करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.यावेळी विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण,श्रीमती शुभांगी पाटील यांच्या हस्ते वृषाली कांबळे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा व भारतीय राज्यघटनेची प्रत भेट देऊन सन्मानित करण्यात आले. बार्टी मुख्यालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या उपस्थित पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विभागप्रमुख डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण वृषाली शिंदे, अनिल कारंडे, शुभांगी पाटील,विकास गायकवाड यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.सुत्रसंचलन सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक विकास गायकवाड यांनी केले.तसेच आभार विभागप्रमुख शुभांगी पाटील यांनी मानले.






# विवाहितेचे अपहरण करून अत्याचार

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** एका विवाहितेचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार करण्यात आला. तिच्या जवळील दागिने व रोखही हिसकाविण्यात आली. ही धक्कादायक घटना येवदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी पीडित विवाहितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला.
शेख आसीम शेख कलीम (२८) रा. येवदा व मोबिन पठाण (३५) रा. खोलापूर अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पीडित २१ वर्षीय विवाहिता ही ४ मे रोजी आपल्या मुलीसह भावाच्या साक्षगंधाच्या कार्यक्रमाकरिता येवदा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात आली होती. त्यावेळी तिच्यासोबत पतीने दिलेले १ लाख ५० हजार रुपये रोख, सोन्याची पोत, एक छोटे मंगळसूत्र, नथ, सोन्याचे कानातले, मुलीचे हातातील सोन्याचे कडे, लॉकेट, अंगठी व चांदीचे कडे असे सोन्या-चांदीचे दागिनेदेखील होते. दरम्यान, तेथे तिची आरोपी शेख आसीम याच्याशी भेट झाली. त्यांच्यात मोबाइलवर संवादसुद्धा झाला. त्यावेळी शेख आसीमने तिला प्रेमजाळ्यात ओढले.
माझ्यासोबत चल, आपण लग्न करू, दुसऱ्या गावात जाऊन आपला संसार मांडू, असे त्याने तिला सांगितले. त्याचवेळी कुणाला काहीही सांगितले, तर तुझ्या कुटुंबाला मारून टाकीन, अशी धमकीही त्याने दिली. त्यामुळे पीडित विवाहिता ही ९ मे रोजी सकाळी शेख आसीम व मोबिन पठाण यांच्यासोबत घरून निघून गेली. त्यानंतर शेख आसीम याने पीडित विवाहितेवर जबरीने अत्याचार केला. १३ मे रोजीसुद्धा त्याने तिचे लैंगिक शोषण केले. त्याचवेळी कुणीतरी पीडित विवाहितेकडील सोन्याचे दागिने व रोख हिसकावून घेतली. शेख आसीम व मोबिन पठाण यांच्या तावडीतून सुटका झाल्यावर पीडित विवाहितेने येवदा ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

# प्रिटींग शाई तयार करणाऱ्या कंपनीला आग

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** शहरात उन्हाचा तडाखा वाढत आहे. गुरुवारी सकाळी हिंगणा एमआयडीसी परिसरातील वर्षा प्रिटींग सहित्य आणि पेन शाई उत्पादक कंपनीला आग लागून त्यात लाखो रुपयाचे नुकसान झाले. कंपनीत केमिकल्स असल्यामुळे आगीचा भडका उडाला. अग्निशमन विभागाच्या सहा गाड्या घटनास्थळी पोहचल्यानंतर जवळपास दोन तासानंतर आग आटोक्यात आणली गेली. या आगीत कुठलीही मनुष्यहानी झाली नाही.
एमआयडीसी परिसरात महिंद्र ॲन्ड महिंद्र कंपनीच्या मागे वर्षा प्रिंटींग साहित्य आणि पेनची शाई उत्पादक कंपनी आहे. सकाळी सातच्या सुमारास कंपनीतून धूर निघत असल्याचे दिसल्यावर तेथील एका सुरक्षा रक्षकाने आणि परिसरातील एका व्यक्तीने अग्निशमन विभागाला माहिती दिली.

# शेती मशागतीची लगबग सुरू; धोकादायक विद्युत तारा तीन फुटांवर

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कलमध्ये ठिकठिकाणी महावितरण कंपनीचे इलेक्ट्रीक पुरवठा तारी शेतालगत तीनतीन चारचार फुटांवर खाली शेतात असल्याने शेतकऱ्यांनी खरिप पिक हंगाम पेरणीपूर्वी मशागत कसी करावी की शेती यांच्या साठी खाली ठेवावी की काय असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. तालुक्यात वीजमहावितरण कंपनीचे ठिकठिकाणी जागोजागी विज पुरवठा तारी खाली असल्याबाबत अनेक बातम्यांच्या माध्यमातून कंपनीला अवगत केले परंतु काही करता विभाग जागी होत नाही. सद्या मौजे बोडखा येथे शेत गट क्रमांक २६१-६७२ याठिकाणी व इतर ठिकाणी विजपुरवठा करणारी तारी तीनतीन चारचार फुट खाली आलेली असुण डोके तोंडावर खरिप पिक हंगाम आहे तर शेतकऱ्यांना पेरणीपूर्वी मशागत करायची आहे विभागाला याबाबत सुचना निवेदन करुनही विभाग चिडीचूप आहे.विभागासाठी आता शेती खाली सोडायची की काय?असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.शेती मशागत साठी तारी वर करून द्यावी असे निवेदन विज महावितरण कंपनीला दिले आहे तर माहिती म्हणून आमदार प्रशांत भाऊ बंब व आमदार सतिष भाऊ चव्हाण यांना निवेदन दिले आहे.यावर मुख्तार बंडु पटेल,इलीयास अहमद पटेल,सलीम पटेल,शेख अब्दुल,जमील पटेल,दस्तगीर पटेल आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# नारायणा इंटरनॅशनल स्कूल ज्यु. कॉलेज लोहा विज्ञान, वाणिज्य, कला शाखेचा शंभर टक्के निकाल

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** बारावी बोर्ड परीक्षेच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निकालामध्ये लोहा शहरातील नामांकित नारायणा इंटरनॅशनल स्कूल ज्यु. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी दरवर्षी प्रमाणे यंदाही विज्ञान/वाणिज्य /कला शाखेच्या १००%निकालाची उज्वल यशाची परंपरा कायम ठेवत दैदिप्यमान यश संपादित केले आहे. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १२ वीच्या घेण्यात आलेल्या परीक्षेत कॉलेजच्या विज्ञान/वाणिज्य /कला शाखेचा १००% निकाल लागला आहे. विज्ञान शाखेतून मेहेत्रे अर्जुन संजीव ८५.६७%घेऊन महाविद्यालयातून प्रथम आला आहे.तर मुंडे स्नेहजा संजय ८५.१७% घेऊन महाविद्यालयात दुसरी आली आहे. तर पयघान ऋषिकेश सुनील व कागणे आदित्य रामजी यांनी संयुक्तरित्या ८३.१७% घेऊन तिसरा क्रमांक पटकावला. तसेच ८०% पेक्षा जास्त गुण घेणारे २५ विद्यार्थी ७०%पेक्षा जास्त गुण घेणारे ५० विध्यार्थी तर बाकीचे विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. त्याच बरोबर JEE ADVANCE साठी नारायणा इंटरनॅशनल स्कूल ज्यु. कॉलेज चे ६५ विध्यार्थी पात्र झाले आहेत. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष नारायणराव मुंडे सर, सचिव नामदेवराव केंद्रे सर, मुख्याध्यापक शिवाजी केंद्रे सर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन व सत्कार केला.

# महसूल विभागाच्या आशीर्वादाने अवैध रेती वाहतूकीला कंटाळून महिला सरपंचाने दिला आत्मदहनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज


**ज़ैनुल आबेद्दीन**

**बुलढाणा :** जिल्ह्यातील सिंदखेडराजा तालुक्यातील



निमगाव वायाळ येथील खडकपूर्णा नदीपात्रातून लाखो ब्रास वाळू चे उत्खनन दिवसरात्र जेसीबी ने महसूल विभागाच्या आशिर्वादाने सुरू असून सदर रेती घाटाचे तांत्रीक मोजमाप व सीसीटीव्ही फुटेज मिळण्यासाठी वारंवार अर्ज निवेदन देऊन ही महसूल विभागाने लोकप्रतिनिधीची दिशाभूल केली असल्याचे शेवटी निमगाव वायाळ येथील महीला सरपंच सौ शिला चाटे यांनी सात दिवसांत निमगाव वायाळ येथील रेती घाटाचे तांत्रीक मोजमाप करून दोषी अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी अन्यथा कारवाई न झाल्यास २७ मे रोजी निमगाव वायाळ येथील रेतीघाटात आत्मदहन करण्याचा इशारा तारीख २१ मे रोजी दिलेल्या निवेदनात दिला आहे

याबाबत सविस्तर वृत्त असे की निमगाव वायाळ येथील खडकपूर्णा नदीपात्रातून शासकीय लिलाव झाला असून सदर लिलाव क्षेत्रात लाखो ब्रास रेतीचे अवैध उत्खनन झाले असून सदर रेती घाटाचे तांत्रीक मोजमाप करून दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही करावी यासाठी निमगाव वायाळ येथील महीला सरपंचाने वारंवार तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन निमगाव वायाळ येथील शासकीय लिलाव क्षेत्रामधील अवैध उत्खनन याचे मोजमाप करून तसेच सदर रेती घाटातील सीसीटीव्ही फुटेज ची मागणी केली होती मात्र सदर महसूल विभागाने लोकप्रतिनिधी ची दिशाभूल केली असून अद्याप या रेती घाटाचे तांत्रीक मोजमाप केले नाही व अद्याप या घाटातील सीसीटीव्ही फुटेज ही देण्यात आले नाही सदर रेती घाटातील शासकीय ठेकेदाराने तीन हजार सातशे ब्रास उत्खनन केल्याचा अहवाल तहसिल कार्यालयात सादर केला आहे मात्र या रेती घाटाचे मोजमाप केल्यास पाच ते सहा लाख



ग्रामपंचायत कार्यालय,निमगांव वायाळ
पंचायत समिती सिंदखेडराजा जि.बुलडाणा
सरपंच
सौ.शिलाबाई रामेश्वर चाटे
मो.8007436262,8412007241
पत्ता - रा.निमगांव वायाळ ता.सिंदखेडराजा जि.बुलडाणा पिन कोड 443203
दिनांक : 21/05/2023

प्रति,
मा.तहसिलदार साहेब,
तहसिल कार्यालय,सिंदखेडराजा

विषय :- मौजे निमगांव वायाळ येथील लोकप्रतिनिधीची आपल्या कार्यालयाकडून दिशाभूल केल्या बाबत व सात दिवसात न्याय न भेटल्यास रेतीघाटात आत्मदहन करणार.

संदर्भ :- कवि/म.रा./प्रस्तुतकार-१/१२४/२०२४ दि.१३/०२/२०२४

महोदय,
उपरोक्त विषयी मौजे निमगांववायाळ येथील शासकीय रेतीघाटासबंधी आपल्या कार्यालयास वेळोवेळी पत्रव्यवहार करून माहिती मागविली होती सदर माहिती आपल्या कार्यालयाने देण्यास टाळाटाळ केली त्यामुळे मला दिनांक १५/०२/२०२४ रोजी नाविलाजाने उपोषणास बसावे लागणार होते मात्र यावेळेस आपल्या कार्यालयाने लेखी आश्वासन दिनांक १३/०२/२०२४ रोजी दिले या लेखी आश्वासनामुळे मी सदर उपोषण स्थगीत केले मात्र यानंतर तीन महिण्याचा कालावधी उलटूनही अद्याप पर्यंत कुठलीच कार्यवाही आपल्या कार्यालयाने केली नाही सदर रेती घाटातुन आजरोजी दिवसरात्र जेसीबी व पोकलेंड सहाय्याने रेतीचे उत्खनन होत आहे. हे उत्खनन रोखून सदर रेती घाटाची सात दिवसाच्या आत दि.२७/०५/२०२४ पर्यंत सदर रेती घाटाची तांत्रीक मोजणी व या रेती घाटाचे सिसिटीव्ही फुटेज मला उपलब्ध करून दोषी अधिकाऱ्यावर तात्काळ गुन्हे दाखल करून न्याय द्यावा अन्यथा २७/०५/२०२४ रोजी मी कुठल्याहीक्षणी रेती घाटात आत्मदहण करणार असून यास आपला विभाग सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

सहपत्र :-
कवि/म.स./प्रस्तुतकार-१/१२४/२०२४ दि.१३/०२/२०२४ ची प्रत

सरपंच
सौ.शिलाबाई रामेश्वर चाटे
ग्रामपंचायत,निमगांव वायाळ
ता.सिंदखेड राजा जि.बुलडाणा

ब्रास चे आज रोजी उत्खनन झाल्याचे दिसून येत आहे वरील उत्खनन हे महसूल कर्मचाऱ्यांच्या आशिर्वादाने झाले असून सदर रेती घाटाचे तांत्रीक मोजमाप झाल्यास यात महसूल विभागाचे अनेक अधिकारी गोत्यात येणार असल्याने सदर घाटाचे तांत्रीक मोजमाप करण्यात आले नाही असे एका वरिष्ठ अधिकारी सांगितले आहे सदर रेती घाटातील अवैध रेती उत्खनन याचे मोजमाप करून या घाटातील सीसीटीव्ही फुटेज देण्यात यावे व अवैध रेती उत्खनन प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही करावी यासाठी येथील महिला सरपंच यांनी तहसिलदार यांना निवेदन देऊन केली आहे तसेच सदर रेती घाटातील सात दिवसांत कारवाई झाली नसल्यास याच रेती घाटात आत्मदहन करण्याचा इशारा दिला असून या आत्मदहनास महसूल विभाग जबाबदार राहील असे निवेदनात शेवटी म्हटलं आहे.

निमगाव वायाळ येथील येथील शासकीय रेती घाट क्षेत्रात दिवसरात्र जेसीबी ने उत्खनन सुरू आहे याबाबत महसूल विभागाला याबाबत माहिती देऊन ही महसूल विभागाने कर्मचारी फक्त या घाटात येऊन अर्थ पुर्ण व्यवहार करून निघून जातात मात्र कारवाई करीत नसल्याने या रेती तस्कराने मुजोरी वाढली असून महसूल विभागाच्या आशिर्वादाने माझ्या जिवाला व कुटुंबाला धोका निर्माण झाला असून माझ्या कुटुंबावर कुठल्याही वेळी हल्ला होऊ शकतो जर माझ्या जिवाला व कुटुंबालाही काही धोका झाल्यास याला रेती तस्कर व महसूल विभागातील कर्मचारी जबाबदार धरावे अशी माहिती दैनिकाशी बोलतांना महीला सरपंच शिला रामेश्वर चाटे यांनी दिली.

सदर रेती घाटाचे मोजमाप करण्यासाठी तत्कालीन लाचखोर तहसिलदार सचिन जैस्वाल यांनी भूमी अभिलेख कार्यालय व सार्वजनिक बांधकाम विभाग यांना मोजमाप करण्याचे पत्र २ मार्च रोजी दिले होते मात्र या कारवाईत आपण गोत्यात येणार असल्याने मात्र सदर पत्राचा पाठपुरावा केला नसल्याने सदर घाटाचे मोजमाप झाले नाही.

निमगाव वायाळ येथील खडकपूर्णा नदीपात्रातून अवैध उत्खनन झालेल्या ठिकाणचे मोजमाप झाल्यास शासकीय लिलावधारक व अनेक महसूल कर्मचारी यांच्यावर कारवाई होणार आहे त्यामुळे सदर घाटाचे मोजमाप करण्यासाठी फक्त पत्रव्यवहार केला जाणार आहे मात्र मोजमाप होणार नाही यासाठी अनेक राजकीय नेत्यांनी चंग बांधला आहे अशी माहिती एका राजकीय कार्यकर्ते यांनी दिली आहे.

## काठी आणि कुऱ्हाडीने मारहाण करून जखमी केले; तिघांविरुद्ध गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** मजुरांना रोजाने घेऊन जाण्याच्या कारणावरून काठी आणि कुऱ्हाडीच्या तुंबटण्याने मारहाण करून फिर्यादीस जखमी केल्याप्रकरणी खल्याळ गव्हाण येथील तिघांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदविला. फिर्यादी हे रोजाने गावातील लिंबा चव्हाण यांचे शेणखत भरण्यासाठी हिरो जोशी व बाजीराव नाना खंडागळे यांचे सोबत जात असताना आरोपी क्रमांक एक विठोबा फोंदे याने फिर्यादी सोबत रोजाने घेऊन जात असलेल्या मजुरांवरून वाद करून फिर्यादीत शिवीगाळ केली व लाकडी काठीने डोक्यात मारहाण केली तर आरोपी क्रमांक दोन रामकिसन आदबने याने कुऱ्हाडीचे तुंबटनेने फिर्यादीस मारहाण केली तसेच शिरू जोशी यांनी सुद्धा लाताबुक्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली.
मेडिकल रिपोर्ट आणि शेख जुबेर शेख हबीब वय ३४ यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी विठोबा फ़ोन्दे , रामकिसन आदबने व शिरू जोशी या तिघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला सहायक फौजदार नारायण गीते तपास करीत आहे.

## भाजप पक्षाच्या वतीने पाणी समस्यासाठी दोन तास ठिय्या आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** शहरात नगर परिषदेच्या वतीने विस्कटलेल्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना नाहाक त्रास होत असल्याने भाजप पक्षाच्या वतीने दोन तास तप्त्या उन्हात जोरदार घोषणाबाजीने करत ठिय्या आंदोलन करून जोरदार घोषणाबाजीने परिसर दणाणून सोडला होते. यावेळेस नगरपरिषद अधिकारी तोडकर यांच्याकडे निवेदन देऊन त्वरित पाणीपुरवठा व्यवस्थित करावा नसता लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.
जिंतूर शहरात नगर परिषदेच्या वतीने मागील दोन ते तीन महिन्यापासून नळाला पाणी पुरवठा विस्कळीत झाला त्यामुळे कडक उन्हात नागरिकांना नाहाक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्या कारणाने दि. 21 मे दुपारी तप्त्या उन्हात भाजप पक्षाच्या अनेक पदाधिकारी नागरिकांच्या उपस्थित नगरपरिषद कार्यालयाचे गेट लावून तब्बल दोन तास न.प.पाणी द्या !पाणी द्या!,पाणी पट्टी वाढवली तरी पाणी द्या!,यासह इतर विविध घोषणाबाजी करत दोन तास ठिय्या




जिंतूर न .प .पाणीपुरवठा करताना भेदभाव केला जातो काही नेत्यांच्या वार्डात नियमित पाणीपुरवठा होतो तर काही भागात जानूबूजुन पाणी पुरवठा होत नसल्याने याकडे अधिकार्यांनी लक्ष द्यावे तसेच यापुढे वेळेवर नळाला पाणी पुरवठा झाला नाही तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन भाजप पक्षाच्यावतीने करण्यात येईल याची प्रशासनाने दक्षता घ्यावी . **किशोर जाधव, भाजपा कार्यकर्ता**

आंदोलन करण्यात आले आहे. त्यांनंतर आक्रमक आंदोलक कार्यालयात गेले व अधिकारी व आंदोलक यांच्यांत शाब्दिक चकमक होत होती. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन यावेळेस परभणी पोलीस गोपनीय शाखेचे पोलिस हवालदार जिया खान पठाण यांनी आंदोलक व न.प. अधिकारी यांच्यात मध्यस्थी केली शेवटी न.प. अधिकारी तोडकर यांनी सांगितले आपणास यासाठी पुन्हा आंदोलन करण्याची गरज पडणार नाही आम्ही लवकरच योग्य पाणीपुरवठा व्यवस्थित करु त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी निवेदन दिले या निवेदनावर भाजप पदाधिकारी किशोर जाधव, गणेश कुरे, डॉ.पंडीत दराडे, सय्यद फेरोज, मुसा कुरेशी, सुर्यवंशी,गुजर मोहीते यांसह अनेक नागरिकांचे हस्ताक्षर आहे.



## माता भगिनींचा सन्मान करा : स्वामी परमानंद गिरी

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** सद्‌गुरूंच्या सानिध्यात जीवाचा उद्धार होतो म्हणून संत सेवा केली पाहिजे, अती पाप झाले तर दुष्टांचा संहार करण्यासाठी भगवंत अवतार घेतो म्हणून भक्त प्रल्हादला वाचविण्यासाठी नृसिंह अवतार घेतला असे प्रतिपादन महामंडलेश्वर परमानंद गिरी महाराज यांनी केले. कोपरगाव तालुक्यातील कान्हेगाव येथे भगवान नृसिंहाचे जयंती उत्सव साजरा केला त्याप्रसंगी प्रवचनातून ते बोलत होते.
कान्हेगाव येथे भगवान नृसिंहाचे गोदावरी नदी किनारी पुरातन मंदिर असून गेल्या अनेक वर्षापासून प्रकट उत्सव साजरा केला जातो. हे अतिशय जागृत देवस्थान असून ह्या वर्षी जप, अनुष्ठान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना महाराज म्हणाले की, माता भगिनींचां सन्मान केला पाहिजे. सर्व माता, भगिनी देवीचा अवतार आहेत. त्यांच्यामध्ये प्रचंड सामर्थ्य असते. त्या खूप काही करू शकतात. भगवान शिव जे काही करतात त्यामागे जी शक्ती आहे ती अर्धांगिनी देते.
या सप्ताह काळात अनेक साधू संतांनी याठिकाणी भेट दिली. कोपरगाव तालुक्याचे आमदार आशुतोष काळे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, गोदावरी दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे, माजी सभापती मच्छिंद्र टेके, बाजार समितीचे मधुकर टेके,नामदेव जाधव यांचेसह परिसरातील बहुसंख्य नागरिकांनी भेटी दिल्या. सदर सत्संग प्रसंगी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी कान्हेगाव, वारी, भोजडे, रामवाडी, संवत्सर, धोत्रे, तळेगाव, अंदरसुल, सडे आदीसह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# बायपास दिलेल्या रस्त्यांसाठी २२.३८ कोटी मंजूर

## आमदार रोहित पवार यांच्या प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**सुभाष माळवे**

**कर्जत :** नगर-करमाळा महामार्गासाठी १०३१ कोटी रुपये आणून या महामार्गाचे काम मार्गी लावल्यानंतर आमदार रोहित पवार यांनी या मार्गावर बायपास दिलेल्या चार गावांमधील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तब्बल २२.३८ कोटी रुपये मंजूर करुन आणले आहेत. याबाबत त्यांनी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला होता.



कर्जत जामखेडचे आमदार म्हणून निवडून आल्यानंतर रोहित पवार यांनी मतदारसंघातील रस्ते सुधारणेवर जाणीवपूर्वक लक्ष दिले. त्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या माध्यमातून सुमारे अडीच हजार कोटी रुपये केवळ रस्त्यांसाठी मंजूर करुन आणले. त्यामुळे आज रोजी कर्जत-जामखेड मतदारसंघातील रस्त्यांमध्ये अमूलाग्र बदल झाल्याचे दिसत आहे. रस्त्यांची अनेक कामे पूर्ण झाली असून काही कामे ही सुरु आहेत.

नगर करमाळा रस्त्यासाठीही आमदार रोहित पवार यांनी केंद्रीय भुपृष्ठवाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करुन १०३१ कोटी रुपये मंजूर करुन आणले आहेत आणि हे काम आता पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. या मार्गावर कर्जत तालुक्यातील मिरजगाव आणि माही जळगाव या गावांना बायपास दिला आहे. या गावातील अंतर्गत रस्ते लहान आणि खराब असल्याने अपघात होण्याचे प्रमाण वाढले होते.

> ''कर्जत-जामखेड मतदारसंघातून जाणाऱ्या तीन महामार्गांसाठी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी यापूर्वी १६०० कोटी रुपये मंजूर केले आहेत. तसेच आताही मी केलेल्या विनंतीनुसार नगर-करमाळा रस्त्याला बायपास दिलेल्या गावांमधील अंतर्गत रस्त्यांच्या सुधारणेसाठी त्यांनी २२.३८ कोटी रुपये मंजूर मंजूर केले. विकासाच्या बाबतीत कोणताही भेदभाव न करणारे नेते ही ओळख गडकरी साहेबांनी पुन्हा एकदा सिद्ध केली. याबाबत माझ्या मतदारसंघातील नागरिकांच्यावतीने मी गडकरी साहेबांचे मनापासून आभार मानतो!''
>
> **रोहित पवार, (आमदार, कर्जत-जामखेड)**

त्यामुळे खराब झालेल्या या अंतर्गत रस्त्यांच्या सुधारणेसाठीही निधी देण्याबाबत आमदार रोहित पवार यांनी नितीन गडकरी यांच्याशी पत्रव्यवहार केला होता आणि प्रत्यक्ष भेटही घेतली होती. यावेळी श्रीगोंदा तालुक्यातील रुईछत्तीसी आणि घोगरगाव या गावांमध्येही बायपास देण्यात आला असून तेथील रस्त्यांबाबतची चर्चा झाली. त्यानुसार बायपास दिलेल्या या चारही गावातील अंतर्गत रस्त्यांच्या सुधारणेसाठी नॅशनल हायवेकडून २२.३८ कोटी रुपये मंजूर झाले आहेत आणि हे काम करण्यासाठीची प्रक्रियाही सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे हे काम पूर्ण झाल्यानंतर या चारही गावातील अंतर्गत वाहतूक सुरळीत होऊन अपघातांचे प्रमाण घटेल आणि स्थानिक व्यापारी, शेतकरी, विद्यार्थी, व्यावसायिक या सर्वांसह स्थानिक बाजारपेठेलाही याचा मोठा फायदा होईल.



# कला गुणदर्शन कार्यक्रमातून विविध कलांचे सादरीकरण

## माऊली सेवा दलाकडून प्रेरणा देणारा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**तरडगाव :** अनेक माणसांमध्ये अनेक प्रकारच्या कला दडलेल्या असतात. परंतु त्या कलांना सादर करण्याची संधी मिळत नसते. तेव्हा त्या कला लोकांपर्यंत येत नाहीत. अशा कलांना बाहेर पडण्यासाठी संधी मिळणे सुद्धा तितकेच गरजेचे असते. अशा कलांना संधी मिळवून देणाऱ्या एका अनोख्या व कलेला प्रेरणा देणाऱ्या उपक्रमाचे आयोजन फलटण तालुक्यातील तरडगाव (ब्रह्मचैतन्य मंगल कार्यालय) येथे करण्यात आले होते.श्री.संत ज्ञानेश्वर माऊली सेवा दल यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या "कला गुणदर्शन"या अनोख्या उपक्रमातून अनेकांना स्व कलेचा कलाविष्कार सादर करण्याची संधी प्राप्त झाली.यावेळी विविध कलांचे सादरीकरण करण्यात आल्याने सर्वांनीच या आयोजना बद्दल माऊली सेवा दलाचे तसेच सहभागी कलादर्शन घडवून आणणाऱ्या सर्वांचेच विशेष कौतुक केले.याच दरम्यान विविध क्षेत्रात यश मिळविणाऱ्या गुणवंतांचा सत्कार सोहळा सुद्धा संपन्न करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन तसेच संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली.यावेळी आमदार दिपकराव चव्हाण,कमिन्सचे प्रविण गायकवाड, माऊली सेवा दलाचे संस्थापक अध्यक्ष सतिश गायकवाड, माजी सरपंच जयश्रीताई चव्हाण,माजी सरपंच अतुल गायकवाड, प्रा.रविंद्र गायकवाड, मुरलीधर गायकवाड,डॉ. लालासाहेब गायकवाड, राजेंद्र गायकवाड, मोहनराव अडसूळ,सुभाषराव झुंजार, निवृत्ती राऊत, सुभाष गायकवाड, संतोष कुंभार, जितेंद्र गाडे, चंद्रकांत चिरमे, महावीर शहा, तनुजा गायकवाड, सुनील क्षीरसागर, डॉ.राजकुमार निकम आदीं सह इतर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सरतेशेवटी मनोगत व्यक्त करताना आमदार दिपकराव चव्हाण यांनी माऊली सेवा दलाचे विशेष कौतुक केले.शिवाय "पड रं पाण्या पड रं पाण्या" हे मराठी गाणे सुद्धा गायिले. माऊली सेवा दलाचे संस्थापक अध्यक्ष सतिश गायकवाड यांनी प्रास्ताविक पर मनोगत व्यक्त करताना हा कार्यक्रम घेण्यामागचा उद्देश सांगितला.

कलादर्शन कार्यक्रमास सुरुवात होत असताना चित्रकार गणेश गुरखा या युवकाच्या बासरी वादनाने एक रंगत निर्माण झाली.याच दरम्यान कौस्तुभ हेमंत अडसुळ (आयसीएसई १० वी.देशात दुसरा), शंभुराज संजय जगताप (अथलेटीक मध्ये सुवर्णपदक), प्रज्वल प्रदिप अडसुळ (सीईटी महाराष्ट्रात दुसरा), नुतन प्रशांत अडसुळ (हालीबाल सुवर्ण पदक),जनार्दन अडसुळ (कृषिनिष्ठ २०२२ पुरस्कार),यशराज राजेंद्र गायकवाड (नशनल कबड्डी स्पर्धा) ,संजय जाधव (राष्ट्रीय पदक प्राप्त),सौरभ दत्तात्रय कदम (कृषी अधिकारी),रोहन पोपट अडसूळ (एच एस सी-सीबीएसई ९२%) आदी गुणवंतांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.तदनंतर कविता वाचन, गीतगायन,नृत्य,पोवाडा आदी कला गुण दर्शन पाहायला मिळाले. राजश्री राजकुमार निकम (कविता वाचन), सागर गौतम गायकवाड (गीतगायन), मेघा राहुल गायकवाड (कविता वाचन), शिवाज्ञा नितीन गायकवाड(नृत्य), सुरेंद्रकुमार घाडगे काव्यवाचन), तानाजी विष्णुपंत गायकवाड प्रवचन),राजनंदिनी अमोल गायकवाड (नृत्य), सुशिल सुदर्शन गायकवाड (कविता वाचन), पुष्पलता तानाजी गायकवाड(कविता वाचन), सीमा राजेंद्र पावर (कविता वाचन),प्रवीण गायकवाड (गीतगायन), सतिश गायकवाड (गीतगायन),आराध्या दादासो भोसले (नृत्य), वैभवी चेतन गायकवाड (नृत्य), अनघा योगेश गायकवाड (नृत्य), विराज विलास गायकवाड (पोवाडा गायन),नवनाथ गोवेकर (कविता वाचन),अमोल वसंतराव गायकवाड (गीतगायन),सचिन बावकर (गीतगायन) आदींनी या कार्यक्रमात सहभागी होत स्व कलांचे सादरीकरण केले. आवाज मै ना दूनगा,मनाच्या धुंदीत लहरित ये ना, ओ हंसिनी मेरी हंसिनी,विठू माऊली या गाण्यांसह चिरेबंदी वाडा,सब घोडे बाराटक्के, ती आणि मी, तू खुद की खोज मे निकल आदि कविता सादर करण्यात आल्या.तसेच कोरोना काळातील जीवन आणि सामाजिक परिस्थितीवर सुद्धा अनेक कवीकडून चित्रण मांडण्यात आले.विविध कलांचे सादरीकरण या कार्यक्रमातून पाहायला मिळाल्याने लोकांनी विशेष समाधान व्यक्त केले.

तरडगावच्या इतिहासात एक आगळा वेगळा उपक्रम घेण्यात आल्याने ह्या उपक्रमाचा सर्वांनीच मनापासून आनंद लुटला.माऊली सेवा दलाचा वर्धापनदिन जवळ आलेला असून पुढील वर्षांत सुद्धा विविध नव नवीन उपक्रम हाती घेतले जाणार असल्याचे सतीश गायकवाड यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ गोवेकर तर स्वागत पर मनोगत अमोल दामोदर गायकवाड आणि आभार प्रदर्शन सचिन बावकर यांनी केले.

अल्पोहाराने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माऊली सेवा दलाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी विशेष मेहनत घेतली.

# साहेब तुम्हीच सांगा, शेती रासायनिक करू की सेंद्रिय? : महेशसिंह ठाकूर

## खतांची दरवाढ शेतकऱ्यांच्या पथ्यावर : शेती तोट्याचाच

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात व्यवसायातून कोणतेही उत्पादन घेण्यासाठी रासायनिक, सेंद्रिय खतांचा वापर करणे महागडे ठरत आहे. परिणामी शेती व्यवसायात तोटाच सहन करावा लागतो. रासायनिक खतांचे भाव वाढले आहेत आणि सेंद्रिय खत वापरले तर त्याचा एकूण उत्पन्नावर विपरीत परिणाम होतो. लागवड खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या तुलनेत शेतमालाच्या आधारभूत किमती मात्र फारच कमी आहे. त्यामुळे या व्यवसायात तोटा सहन करावा लागतो. रासायनिक खतांचा व तणनाशक औषधांचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याने जमिनीचा स्तर घसरला आहे. तसेच यामुळे जमिनीत हवा खेळती राहत नाही, पाण्याचा निचराही होत नसल्याने



उत्पादनात घट येत आहे. शेती पुरेपूर रासायनिक खतांच्या वापराची झाली आहे. त्यामुळे सेंद्रिय खते त्वरित कार्य करणे शक्य नाही, यासाठी भरपूर अवधी लागेल, यासाठी काही प्रमाणात सेंद्रिय खतांचा वापर करावा लागत असल्याचे मत महेशसिंह (सोनू) ठाकूर देव्हारी यांनी व्यक्त केले आहे .सेंद्रिय खतांचाही तुटवडा सोयगाव तालुक्यात बरेच शेतकरी सेंद्रिय खतांचा वापर करून शेती व्यवसाय करण्यावर भर देत आहेत, पण सेंद्रिय खत स्वतः अंगमेहनत करून तयार करावे लागते, पण असे मात्र खूप कमी शेतकरी करतात, यामुळे सेंद्रिय खतांचा तुटवडा भासत आहे. त्यामुळे पारंपरिक शेतीच कामाची ठरते. सेंद्रिय शेतीतून भागणार कसे?

आता शेती पूर्णतः रासायनिक खतांनी माखली आहे. या खतांच्या वापरामुळे उत्पन्नातही वाढ झाली आहे; पण आता सेंद्रिय खतांचा वापर केल्यास तुलनेत उत्पादनात कमालीची घट येईल, आणि वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत उत्पादन फार कमी होईल. सेंद्रिय खते तरी स्वस्त कुठे?रासायनिक खते कृषी केंद्रातून सहज उपलब्ध होतात; पण सेंद्रिय खत मात्र तयार करावे लागतात, जर सेंद्रिय खत विकत घ्यायचे असल्यास यासाठी अधिक रक्कम मोजावी लागते असल्याचे महेशसिंह (सोनू)ठाकूर देव्हारी ता सोयगाव यांनी बोलताना सांगितले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर